सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २१९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# बिहारमध्ये एनडीएची सत्ता, भाजप सर्वात मोठा पक्ष



**भाजप - ७४ | जेडीयू - ४३ | आरजेडी - ७५ | काँग्रेस - १९ | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया - ९ | एमआयएम - ५**

पाटणा : बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांसाठी ६ आणि ११ नोव्हेंबर असे दोन टप्प्यात मतदान झाले. आता मतमोजणी सुरू आहे. हाती आलेले आतापर्यंतचे कल बघता भारतीय जनता पार्टी ९० जागांवर तर जनता दल युनायटेड ८२ जागांवर, लोक जनशक्ती पार्टी (रामविलास पासवान गट) २० आणि हिंदुस्तानी अवाम मोर्चा (सेक्युलर) ५ जागांवर आघाडीवर आहे. एनडीएने आतापर्यंत १९७ जागांवर आघाडी घेतली आहे. बिहारमध्ये बहुमताचा जादुई आकडा १२२ आहे. एनडीएने तर त्यापेक्षा जास्त जागांवर आघाडी घेऊन स्वतःची बाजू भक्कम केली आहे. विरोधात असलेल्या महागठबंधनने निराशाजनक कामगिरी केली आहे. राष्ट्रीय जनता दल २८ जागांवर, काँग्रेस ५ आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया ३ जागांवर आघाडीवर आहे. आतापर्यंतची स्थिती बघता बिहारमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वात मोठा पक्ष ठरणार असे चित्र आहे. जनता दल युनायटेड राज्यात दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष झाला आहे.

बिहारमध्ये सध्या नितीश कुमार मुख्यमंत्री आहेत. पण भाजप राज्यात मोठा पक्ष झाल्यामुळे आता मुख्यमंत्री नितीश होणार की भाजपचा एखादा आमदार होणार हा प्रश्न सध्या अनुत्तरित आहे. भाजपचे नेते सध्या एनडीएचा विजय हा मुद्दा मांडत आनंद साजरा करत आहेत. पण मुख्यमंत्री या विषयावर बोलणे टाळत आहेत. यामुळे बिहारमध्ये एनडीएचा विजय झाला तरी मुख्यमंत्री या पदावरून पुढील काही दिवस राजकारण रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### बिहार विधानसभा निवडणूक निकाल २०२५ (आघाडीवर)

भाजप ९० जेडीयू ८२ एलजेपी (रामविलास पासवान गट) २० एचएएम ५ आरजेडी २८ कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया ३ एमआयएम ५ काँग्रेस ५ राष्ट्रीय लोकमोर्चा ४ बसप १

### बिहारमध्ये एकूण मतदार

बिहारमध्ये ७४.२ दशलक्ष नोंदणीकृत मतदार आहेत. यात ३९.२ दशलक्ष पुरुष आणि ३५ दशलक्ष महिला आहेत. विधानसभेसाठी बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६५.०८ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात ६८.७६ टक्के मतदान झाले.

## बिहारमध्ये एनडीएचा विजय ऐतिहासिक - अजित पवार

मुंबई , १४ नोव्हेंबर, - बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मिळविलेला विजय हा ऐतिहासिक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावरील जनतेच्या दृढविश्वासाचे ते प्रतिक आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

बिहारमध्ये एनडीएच्या सरकारने समाज कल्याणाच्या अनेक क्रांतिकारी योजना राबवल्या. तेथील लाडक्या बहिणींचेसुद्धा त्यांना मोठ्या प्रमाणात आशिर्वाद लाभले. त्याचेच हे यश आहे. बिहारमधील जनतेने डबल इंजिन सरकारला पुन्हा एकदा भरघोस कौल दिला आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल बिहारमधील एनडीएच्या सर्व घटक पक्षांचे अजित पवार यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## बिहारच्या जनतेनं देशाचा मूड स्पष्ट केला- अमित शाह

नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर : बिहार विधानसभा निवडणुकीतील निकालांचा राष्ट्रीय राजकारणावर मोठा प्रभाव पडत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मतदारांशी संबंधित मुद्द्यांवर जोरदार प्रतिक्रिया दिली आहे. बिहारच्या जनतेनं दिलेले प्रत्येक मत हे भारताच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या घुसखोर व त्यांच्या समर्थकांविरोधातील मोदी सरकारच्या भूमिकेवरील विश्वासाचं प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.



अमित शाह म्हणाले की, काही राजकीय पक्षांनी व्होटबँकेसाठी घुसखोरांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र बिहारच्या जनतेनं त्यांना परखड उत्तर दिले आहे.देशातील मतदार याद्यांची फेरतपासणी करणे आवश्यक आहे.याच्या विरोधातील राजकारणाला आता कोणतीही जागा उरलेली नाही असे शाह म्हणाले. राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस बिहारमध्ये शेवटच्या पायरीवर पोहोचल्याचा टोला देखील त्यांनी लगावला. बिहार हे देशातील महत्त्वाचं राजकीय राज्य मानलं जात असल्याने तिथले संकेत राष्ट्रीय पातळीवरील वातावरण ठरवतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. अमित शाह यांच्या या वक्तव्यामुळे पुढील काही दिवसांत केंद्रवर्ती राजकारणात अधिक चर्चेला उधाण येण्याची शक्यता व्यक्त केली जाते.

## बिहारमध्ये काँग्रेसची स्थिती एमआयएमपेक्षा वाईट - फडणवीस



नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर : बिहारच्या इतिहासातील काँग्रेसचा हा सर्वात कमी स्कोअर असून पक्षाची अवस्था एमआयएमपेक्षाही खाली गेली आहे. राहुल गांधी संवैधानिक संस्थांचा अपमान करत राहतील, तोपर्यंत काँग्रेसची हीच अवस्था राहील असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे. बिहार विधानसभा निवडणूक निकालांवर प्रतिक्रिया देताना ते बोलत होते.

भारताच्या राजकारणातील महत्त्वाचे राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिहारमध्ये गेल्या पाच वर्षांत मोठ्या राजकीय उलथापालथी घडल्या. कधी राष्ट्रीय जनता दल (राजद) तर कधी भाजपसोबत राहणारे नितीश कुमार पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख चेहरे म्हणून पुढे आले आहेत. सरीकडे राजदचे नेते तेजस्वी यादव आपल्या पहिल्याच मुख्यमंत्रीपदासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत. निवडणुकीत बिहारच्या जनतेनं एनडीएला मोठे बहुमत दिल्याचे संकेत मिळत असून २०१० च्या विक्रमी कामगिरीलाही मागे टाकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.बिहारमधील राजकीय नाट्य, सतत बदलणारी आघाडी

## खा. सुप्रिया सुळेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

मुंबई : देशभरात सध्या बिहार विधानसभा निवडणुकीची प्रचंड रणधुमाळी सुरू आहे. बिहारमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि सतत घडणाऱ्या राजकीय घटनांमुळे या निवडणुकीने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. सध्या समोर येत असलेल्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, बिहारमध्ये एनडीए आघाडी मिळवू शकते, असे चित्र दिसत आहे. या निकालांचा प्रभाव केवळ बिहारपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणावरही जाणवत आहे.

### मतांचे विभाजन का झाले, याचा अभ्यास हवा : सुप्रिया सुळे

खासदार सुळे यांनी बिहारमधील निकालांकडे गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता व्यक्त केली. निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षित यश न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विश्लेषण करण्याची गरज सांगितली, बिहारमध्ये नेमकं काय झालं आहे, हे आम्ही पाहिलं पाहिजे. निकालाचा पूर्ण उलघडा केला पाहिजे. सुप्रिया सुळे यांनी यावेळी निवडणुकी दरम्यानच्या अनेक घटकांचा अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. आमचा प्रचार, मतदारांपर्यंत पोहोचलेले म्हणणे आणि इतर अनेक बाबी तपासल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या की, पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये आमच्या मतांचं विभाजन का झालं, याबाबत माहिती कळून येईल. खासदार सुळे यांच्या या विधानावरून, बिहारमधील निवडणुकीतील अपयशाची कारणे शोधून पुढील निवडणुकांसाठी योग्य रणनीती आखण्याची तयारी विरोधकांनी सुरू केल्याचे स्पष्ट होते.

याच पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे वर्षा बंगल्यावर दाखल झाल्या आहेत. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना प्रचंड वेग आला आहे. आगामी घडामोडींवर यामुळे नवे समीकरण तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र, आता या भेटीमागील खरे आणि खासगी कारण समोर आले आहे. सकाळी अचानक झालेल्या या भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

## शतप्रतिशत भाजपसाठी रणनीती; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपची राज्यस्तरीय संचालन समिती जाहीर

### केशव उपाध्ये, नवनाथ बन यांच्यावर 'आरोप पत्र प्रमुख' आणि 'मीडिया संपर्क'ची दुहेरी जबाबदारी

मुंबई : भारतीय जनता पार्टी-महाराष्ट्रने आगामी महापालिका, नगर परिषद, नगर पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूक २०२५ साठी महत्त्वाची प्रदेश संचालन समिती जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने जारी झालेल्या या यादीत २३ पदांसाठी जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

समन्वयक म्हणून माधवी नाईक यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहसमन्वयक म्हणून विक्रांत पाटील यांची निवड झाली आहे. जाहिरनामा प्रमुख म्हणून विश्वास पाटील यांना जबाबदारी देण्यात आली आहे.



निवडणूक कार्यक्रम, प्रचार, महिला, युवा, सामाजिक, सहकार, कृषी अशा सर्व विभागांसाठी स्वतंत्र प्रमुख नेमण्यात आले आहेत. विविध समाजघटकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास भाजपने व्यक्त केला आहे. निवडणूक साहित्य, वितरण, मीडिया आय.टी., कारभार, कार्यालयीन समन्वय यांसाठी देखील अनुभवी कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

भाजपने घोषणा केलेली ही समिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत पक्षाची रणनीती मजबूत करण्यासाठी निर्णायक मानली जात आहे.

## माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख यांचा भाजपात प्रवेश

धुळे, १४ नोव्हेंबर : दोंडाईचा शहरातील आगामी नगरपालिका निवडणुकीत मोठा राजकीय उलटफेर घडला असून, माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख यांच्या गटाने आज भारतीय जनता पक्षाला आणि मंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वाखालील विकासकारभाराला जाहीर पाठिंबा घोषित केला आहे. अनेक वर्षे राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून ओळखल्या जाणार्या या दोन गटांमधील एकत्र येण्याच्या निर्णयामुळे दोंडाईच्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. डॉ. देशमुख गटाच्या वतीने माजी नगराध्यक्ष आणि डॉ. हेमंत देशमुख यांचे बंधू डॉ.रविंद्र देशमुख यांनी स्वत मंत्री रावल यांच्या जनदरबार कार्यालयात उपस्थित राहून भाजपाला हा पाठिंबा जाहीर केला. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार सौ.नयनकुंवरताई रावल यांना देखील या गटाचा अधिकृत पाठिंबा घोषित करण्यात आला. सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर राजकीय मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमस्थळी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह दोंडाईचा पालिका पदाधिकारी आणि भाजपचे प्रमुख नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दहशतवादी उमर नबीचे घर आयईडीने उडवले

श्रीनगर, १४ नोव्हेंबर : दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ सोमवारी झालेल्या कार बॉम्ब स्फोटाचा मुख्य आरोपी दहशतवादी उमर नबी याचे पुलवामा येथील घर सुरक्षा यंत्रणांनी उध्वस्त केले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की गुरुवार आणि शुक्रवारच्या मध्यरात्री ही कारवाई करण्यात आली.

दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्ब स्फोटानंतर सुरक्षा दलांनी कठोर पाऊल उचलले आहे. मुख्य आरोपी दहशतवादी डॉ. उमर नबी याचे पुलवामामधील घर पूर्णपणे पाडण्यात आले. दिल्लीतील स्फोटात वापरलेल्या स्फोटकांनी भरलेली कार चालवणारा डॉ. उमर नबी हा पुलवामा जिल्ह्यात राहत होता, आणि त्याचे घर सुरक्षा दलांनी उद्ध्वस्त केले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, गुरुवार-शुक्रवारच्या रात्री ही मोहीम राबवण्यात आली. लाल किल्ल्याजवळ सोमवारी झालेल्या कार स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. स्फोटकांनी भरलेली हुंडई आय-२० ही कार उमर चालवत होता. स्फोटस्थळावरून गोळा केलेल्या डीएनए नमुन्यांची तुलना डॉ. उमरच्या आईच्या नमुन्यांशी केल्यानंतर त्याची ओळख निश्चित झाली. आपल्या परिसरात शैक्षणिकदृष्ट्या कुशल व्यावसायिक म्हणून ओळखला जाणारा उमर नबी गेल्या २ वर्षांत दहशतवादी विचारांकडे झुकला होता, असेही चौकशीत समोर आले आहे.

## कोयंबतूर इथे संस्कृतभारतीचे अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशन

कोयंबतूर (तामिळनाडू), नोव्हेंबर - तामिळनाडूमध्ये प्रथमच आयोजित करण्यात आलेले संस्कृतभारतीचे अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशन दिनांक ७ ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत झाले. या संमेलनास देशातील ४३ प्रांतांमधून २४७२ प्रतिनिधी उपस्थित राहिले, तर इंडोनेशिया व दुबई येथील कार्यकर्त्यांनीही येथे सहभाग नोंदविला.

संस्कृतभारतीच्या या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह श्री. दत्तात्रेय होसबळे यांच्या हस्ते झाले. आपण सर्वांनी संस्कृतमधून संभाषण केले पाहिजे,असे विचार त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी मंचावर श्रीलश्रीकामाक्षीदासस्वामीजी, अमृतानंदमयी विद्यापीठाचे श्री. तपस्यामृतनंदपुरी स्वामीजी, संस्कृतभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गोपबंधू मिश्र, महामंत्री सत्यनारायण भट्ट हे उपस्थित होते. संस्कृत कुटुंब या संकल्पनेवर संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. सुरेश सोनी यांनी मार्गदर्शन केले. संस्कृत भाषेत संवाद करणाऱ्या संस्कृत कुटुंबांचे एकत्रीकरण व अनुभवकथन, तसेच भारतीय ज्ञानपरंपरा या विषयावर आधारित प्रदर्शनी हे संमेलनाचे आकर्षण केंद्र होते.

माता अमृतानंदमयी विद्यापीठाच्या भव्य परिसरात संपन्न झालेल्या या अधिवेशनाचा प्रमुख विषय भारतीय ज्ञानपरंपरा होता. या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे अधिवेशनातील सर्व संवाद, सत्रे, कार्यक्रम, क्रीडा आणि सांस्कृतिक सादरीकरणे संस्कृतमधूनच पार पडली. केंद्र शासनाच्या उच्च शिक्षा मंत्रालयातील भारतीय ज्ञानपरंपरा विभागाचे संचालक प्रा. गंटी सूर्यनारायण मूर्ती यांनी संस्कृत भाषेतून भारतीय ज्ञानपरंपरेचे सुलभ विवेचन केले. पारंपरिक संस्कृत महापंडित आचार्य देवदत्त पाटील (गोवा) यांनी आपल्या प्रबोधनातून पारंपरिक व आधुनिक विचारांचा संगम साधला. आय.आय.टी. हैदराबाद येथे संस्कृत क्रेडिट कोर्स सुरू केल्याबद्दल संस्कृत, तसेच आधुनिक शास्त्रांमधील तज्ज्ञ प्रा. बी.एस. मूर्ती यांचा विशेष गौरव या प्रसंगी करण्यात आला.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये १०० कोटींची गुंतवणूक; सोलार पॅनल उत्पादन व ई-चार्जिंग स्टेशन प्रकल्पाला येत्या सहा माहिन्यात सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : शेंद्राच्या पंचतारांकित एमआयडीसी परिसरात 'फ्लायर रिन्युएबल एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड'तर्फे १०० कोटींची मोठी गुंतवणूक होत असून पुढील सहा महिन्यांत उत्पादन सुरू होणार आहे. कंपनीचे संचालक अविनाश वायाळ यांनी चीनमधील China Tian New Energy (Hubei) Co. Ltd. या कंपनीसोबत सोलार उत्पादन व ई-चार्जिंग क्षेत्रातील दोन महत्त्वपूर्ण करार केले आहेत.

या करारानुसार शेंद्रयात ७०० किलोवॅट क्षमतेचे सोलार पॅनल मॅन्युफॅक्चरिंग युनिट उभारले जाणार असून, येथे २५० मेगावॅट उत्पादनक्षमता असलेले 'फ्लायर सोलर' नावाचे पॅनल तयार करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी ५० कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे. याशिवाय, कंपनीकडून फ्लायर ईव्ही चार्जिंग स्टेशन या नावाने राज्यातील तसेच राष्ट्रीय महामार्गांवर विस्तृत नेटवर्क उभारण्यात येणार असून त्यासाठी अतिरिक्त ५० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, इतर चार्जिंग स्टेशनच्या तुलनेत येथे वाहनचालकांना प्रति चार्जिंग सत्रात शंभर रुपयांपर्यंत बचत होणार आहे, अशी माहिती कंपनीकडून देण्यात आली.




२०२५-२०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगराला नवी ऊर्जा तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून ओळख मिळवून देणारा हा प्रकल्प औद्योगिक वाढीस चालना देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बिहारने दिलेला जनादेश हा मोदींवरील विश्वासाचा शिक्का - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

मुंबई, १४ नोव्हेंबर, : बिहार विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'ला मिळालेल्या विजयानंतर शिवसेना (शिंदे गट) चे खासदार आणि संसदीय पक्षाचे नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या जनादेशाचे स्वागत करत मोदी नेतृत्वावरचा जनतेचा विश्वास पुन्हा अधोरेखित केला आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, बिहारला मिळालेला ऐतिहासिक जनादेश हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेने दाखवलेल्या अखंड विश्वासाचा ठोस पुरावा आहे. बिहारच्या जनतेने भ्रष्टाचार, अराजकता आणि जंगलराजाची आठवण करून देणाऱ्या शक्तींना ठाम नाकारत जंगलराज नव्हे, मंगलराज निवडल्याचे ते म्हणाले.

काँग्रेस आणि तिच्या सहयोगी पक्षांच्या पराभवाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, जाती-धर्माच्या समीकरणांवर आधारित राजकारण आता जनतेला मान्य नाही. काँग्रेसची आमदारसंख्या एकेरीत जाणे हे राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचा पराभव असल्याचे ते म्हणाले. राहुल गांधी यांनी जातीय कार्ड आणि धार्मिक मुद्द्यांवर उभारलेले नरेटिव्ह पूर्णपणे फोल ठरले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

बिहारमधील गरीब, मागासवर्ग, महिला, युवा, शेतकरी आणि कामगार यांनी एकमुखाने एनडीएला साथ दिल्याचे ते म्हणाले.

## थोडक्यात...

### बीबीसीने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मागितली माफी



वॉशिंग्टन, १४ नोव्हेंबर : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (बीबीसी) यांच्यात सुरू असलेल्या विवादाच्या दरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे. बीबीसीने आता आपल्या इन्व्हेस्टिगेटिव्ह कार्यक्रम 'पॅनोरामा' मध्ये दाखवलेल्या संपादित क्लिपबाबत ट्रम्प यांची माफी मागितली आहे. मात्र, या दरम्यान बीबीसीने ट्रम्प यांची भरपाईची मागणी नाकारली असून स्पष्ट केले की, मानहानीचा कोणताही कायदेशीर आधार नाही. बीबीसीचे चेयरपर्सन समीर शाह यांनी व्हाइट हाऊसला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, बीबीसीला या दुर्दैवी चुकीबद्दल खेद आहे. माफीनाम्यात बीबीसीने मान्य केले की संपादित भाषणामुळे लोकांमध्ये अनवधानाने अशी धारणा निर्माण झाली की ते संपूर्ण भाषण पाहत आणि ऐकत आहेत, प्रत्यक्षात भाषणाच्या वेगवेगळ्या भागांना जोडून ते तयार करण्यात आले होते. यामुळे असा आभास झाला की अध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या समर्थकांना यूएस कॅपिटल हिलवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले होते.

### बांगलादेशचे सुरक्षा सल्लागार २० नोव्हेंबरला भारत दौऱ्यावर



नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर : बांग्लादेशचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) खलीलुर रहमान लवकरच भारताला भेट देणार आहेत. या दरम्यान ते भारतीय महासागर क्षेत्र राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार परिषदेत सहभागी होतील. ही परिषद २० नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथे आयोजित केली जाणार आहे. भारतीय महासागरातील पाच देशांदरम्यान होणाऱ्या या परिषदेला कोलंबो सुरक्षा परिषद असे नाव देण्यात आले आहे. भारतीय एनएसए अजीत डोभाल देखील या परिषदेत सहभागी होतील. मीडिया रिपोर्टनुसार, डोभाल यांनी खलील यांना भारत येण्याचे आमंत्रण दिले होते, जे त्यांनी स्वीकारले आहे. दरम्यान, बांग्लादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस यांनी गुरुवारी जाहीर केले की देशात निवडणूक निश्चित वेळेतच होईल. तसेच जुलै चार्टरवर जनमत संकलन देखील ठरलेल्या वेळेनुसारच होणार आहे. युनूस यांच्या म्हणण्यानुसार, हे निर्णय सल्लागार समितीच्या बैठकीत घेतले गेले आहेत.

### रशियन एसयू-३० लढाऊ विमान सराव दरम्यान कोसळले; दोन वैमानिकांचा मृत्यू

मॉस्को, १४ नोव्हेंबर : रशियाचे एसयू-३० लढाऊ विमान प्रशिक्षणादरम्यान फिनलंड सीमेच्या जवळ कोसळले. या अपघातात दोन्ही वैमानिकांचा मृत्यू झाला आहे. रशियन संरक्षण मंत्रालयाने सांगितले की गुरुवारी सायंकाळी फिनलंडच्या सीमेला लागून असलेल्या करेलिया प्रदेशात नियमित प्रशिक्षण उड्डाणावर गेलेले एसयू-३० लढाऊ विमान अपघातग्रस्त झाले, ज्यामुळे त्याच्या दोन्ही क्रू सदस्यांचा मृत्यू झाला. रशियन वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे, मॉस्को वेळेनुसार सायंकाळी साधारण ७:०० वाजता करेलियामध्ये एका नियोजित प्रशिक्षण उड्डाणादरम्यान एसयू-३० लढाऊ विमान कोसळले. मंत्रालयाने सांगितले की विमान कोणत्याही शस्त्रास्त्रांशिवाय उड्डाण करत होते आणि घनदाट जंगल असलेल्या निर्जन भागात कोसळले. प्रादेशिक राज्यपाल आर्टुर परफेनचिकोव यांनी सांगितले की, रशियाच्या उत्तर-पश्चिम करेलिया गणराज्याच्या अधिकाऱ्यांनी कथित दुर्घटनास्थळी आपत्कालीन सेवा पाठवल्या आहेत.

### अंतराळात अडकलेले चिनी अंतराळवीर लवकरच पृथ्वीवर परतणार

बीजिंग , १४ नोव्हेंबर : चीनचे अंतराळात अडकलेले तीन अंतराळवीर लवकरच पृथ्वीवर परत येणार आहेत. अंतराळ मोहिमेदरम्यान त्यांच्या यानाला अंतराळातील मलब्याचा एक तुकडा जाऊन धडकला होता. आता नवीन क्रू अंतराळात पाठवला जात असून, त्यांच्या यानामधून हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील. चीनच्या सरकारी माध्यमांच्या माहितीनुसार, हे तीनही अंतराळवीर अंतराळ स्थानकावर सहा महिन्यांच्या रोटेशनवर होते आणि १ नोव्हेंबर रोजी नवीन पथकाच्या आगमनानंतर चार दिवसांनी पृथ्वीवर परत येणार होते. मात्र, त्यांच्या शेनझोऊ-२० अंतराळयानाला अंतराळातील मलब्याच्या एका छोट्या तुकड्याची धडक बसल्याचा संशय निर्माण झाल्याने त्यांची परतीची योजना रद्द करण्यात आली होती. सरकारी माध्यमांनी सांगितले की आता ते शेनझोऊ-२१ यानाने परत येत आहेत. हे तीन अंतराळवीर - चेन डोंग, चेन झोंगरुई आणि वांग जी - एप्रिलमध्ये तियांगोंग अंतराळ स्थानकावर गेले होते. चीनच्या मानवयुक्त अंतराळ अभियांत्रिकी कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ते (अंतराळवीर) चांगल्या स्थितीत आहेत, काम करत आहेत आणि सामान्यपणे राहत आहेत.



# बी कांदा पिकासाठी सुधारित उत्पादन तंत्रज्ञान

कृषी लागवड



कांदा हे भारतातील सर्वाधिक लागवड होणारे आणि वर्षभर मागणी असलेले भाजीपाला पीक आहे. रबी हंगामातील कांदा विशेषतः साठवणक्षम, दर्जेदार आणि निर्यातक्षम असल्यामुळे त्याला व्यापारीदृष्ट्या याला महत्त्व आहे. महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, जळगाव आणि सोलापूर हे जिल्हे रबी कांदा पट्टे मानले जातात. योग्य शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास या पिकातून अधिक उत्पादन आणि नफा मिळवणे शक्य आहे.

### हवामान व दिवसाची लांबी

कांदा हे दिवसाच्या लांबीस आणि तापमानास संवेदनशील पीक आहे. सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत १२-२४ अंश तापमान आदर्श, तर कंद निर्मिती दरम्यान १५-२१ अंश तापमान उत्तम मानले जाते. ११-१२ तास तेजस्वी सूर्यप्रकाश आणि सुमारे ७० टक्के आर्द्रता मिळाल्यास कांदा चांगला पोसतो.

आवश्यक तापमान व दिवसाची लांबी उपलब्ध असल्यामुळे रबी हंगामात कंद विकास उत्कृष्ट होतो, गड्डे घट्ट, साठवणक्षम आणि रंगाने आकर्षक तयार होतात. अवकाळी पाऊस अथवा अति दमट वातावरणामुळे कंदांची गुणवत्ता कमी होऊ शकते व रोगराई वाढते.

### जमिनीची निवड

हलकी ते मध्यम गाळाची, निचऱ्याची सोय असलेली आणि पीएच ६.५-७.० जमिनीत कांदा उत्तम वाढतो. सेंद्रिय पदार्थांनी संपन्न मुरमाड जमीन कंद विकासासाठी विशेष उपयुक्त. भारी चिकणमाती, खारवट किंवा पाणथळ जमीन कांद्याच्या मुळांच्या वाढीस अपायकारक आहे. अशा जमिनीत वाढ खुंटते, रोग वाढतात आणि उत्पादन घटते.

### बियाणांची निवड

रबी कांद्याचे बियाणे एप्रिल-मे महिन्यात तयार होते आणि ते ताजे असताना उगवणक्षमता सर्वाधिक (८० ते ९० टक्के) असते. बियाणे योग्यरीत्या साठवले नाही तर उगवण कमी होते. त्यामुळे नेहमी प्रमाणित, स्वच्छ आणि रोगमुक्त बियाणे वापरणे अत्यावश्यक आहे.

### रोपवाटिका व्यवस्थापन

रोपवाटिका सुपीक, निचऱ्याची सुविधा असलेली, सिंचनाच्या सोयीजवळ असावी. एक मीटर रुंद सपाट वाफे करून त्यात कुजलेले शेणखत मिसळावे.

बियाणे पेरणीपूर्वी प्रति किलो बियाणास २-३ ग्रॅम कॅप्टन/थायरम चोळून घ्यावे. पेरणी १-२ से.मी. खोलीवर करावी आणि पेंडिमिथालीन २ मिली/लिटर पाण्यात मिसळून वाफ्यावर फवारणी करावी, यामुळे तणांचा प्रारंभिक प्रादुर्भाव कमी होतो.

एक हेक्टर लागवडीसाठी सुमारे ८-१० किलो बियाणे आणि १५-२० गुंठे रोपवाटिका क्षेत्र पुरेसे ठरते. मजबूत, एकसमान व निरोगी रोपे तयार करणे हे उच्च उत्पादनाचे मूलभूत पायाभूत घटक आहेत.

### शिफारस केलेले वाण

- फिकट लाल वाण, ॲग्री फाऊंड लाईट रेड, भीमा शक्ती,
- भीमा किरण, एन २ फोर१, एन-२ फोर-१, पुसा रेड, पांढरे वाण,
- अकोला सफेद, फुले सफेद, भीमा श्वेता, पुसा व्हाईट फ्लॅट

या वाणांमध्ये कांद्याचे उत्तम आकारमान, टिकाऊपणा आणि उच्च बाजारमूल्य आढळते. साठवण क्षमतेमुळे रबी कांद्याला विशेष व्यापारी महत्त्व मिळते.

### पूर्व मशागत

शेतातील मोठी ढेकळे नांगरून फोडावीत व जमीन भुसभुशीत करावी. प्रति हेक्टर ४०-५० गाड्या कुजलेले शेणखत मिसळल्यास जमिनीची संरचना सुधारते आणि सूक्ष्मजीव सक्रिय राहतात. २ मीटर रुंद सपाट वाफे तयार करणे उपयुक्त. भुसभुशीत जमिनीत मुळांची वाढ जास्त होते आणि कंद भरतात.

### खत व्यवस्थापन

**रबी कांद्यासाठी शिफारस केलेली मात्रा:**

- नत्र (एन) : १०० किग्रॅ/हे., स्फुरद (पीओ) : ५० किग्रॅ/हे., पालाश (केओ) : ५० किग्रॅ/हे.

संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा लागवडीच्या वेळी द्यावी. उरलेली नत्राची मात्रा ३० दिवसांनी वरून द्यावी.

- गंधक (एस) हा कंदाच्या गुणवत्तेसाठी महत्त्वाचा घटक असून, गंधकामुळे चव, सुगंध, रंग आणि साठवणक्षमता सुधारते. ३० किग्रॅ/हे. गंधक (बेंटो-सल्फ) जमिनीत मिसळावे.

**सूक्ष्म अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन**

- तांबे, जस्त, मॅग्नीज, बोरॉन यांची कमतरता आढळल्यास खालील द्रावणाची फवारणी करावी :
- झेडएनएसओ ४-०.०१ टक्के, एमएनएसओ ४-०.०१ टक्के,
- सीयूएसओ ४-०.०१ टक्के, एफईएसओ ४-०.०२५ टक्के,
- बोरिक ॲसिड ०.०१५ टक्के
- योग्य प्रमाणात उपलब्धता झाल्यास गड्डे घट्ट व टिकाऊ होतात, रोगकारकता कमी होते आणि साठवण क्षमता वाढते.

### पाणी व्यवस्थापन

- कांद्याची मुळे जमिनीच्या वरच्या थरात असल्यामुळे पाण्याची आवश्यकता कमी पण नियोजनबद्ध असते.
- ऑक्टोबर-जानेवारी : ८-१२ दिवसांच्या अंतराने
- फेब्रुवारी-एप्रिल : ५-८ दिवसांच्या अंतराने

पाणी खोलवर न शिरता फक्त १५ से.मी.पर्यंत ओल पोहचावी. काढणीपूर्वी २-३ आठवडे पाणी बंद करणे अत्यंत आवश्यक. यामुळे कंद अधिक घट्ट बसतो, साठवणक्षमता वाढते आणि बाहेरील पापुद्रा आकर्षक होतात.

### आंतरमशागत

लागवडीनंतर ३० दिवसांनी पहिली आणि पुढील ३० दिवसांनी दुसरी खुरपणी करावी. कांद्याची मुळे वरच्या थरात असल्याने खोलवर खुरपणी टाळावी. तण नियंत्रण नियमित केल्यास पोषक द्रव्यांची स्पर्धा कमी होते व कंद विकास सुधारतो.

**लागवड**

बियाणे पेरणीनंतर ८-९ आठवड्यांनी रोपे पुनर्लागवडीसाठी तयार होतात. आरोग्यदायी, एकसमान आकाराची रोपे निवडावीत. रोपांची मुळे आणि शेंडे थोडे कापून लागवड केल्यास ती लवकर रुजतात.

- लागवडीचे अंतर: १२.५ गुणिले ७.५ से.मी.

ओली लागवड कोरड्या लागवडीपेक्षा अधिक फायदेशीर आहे कारण रुजवण दर चांगला मिळतो आणि वाढ जलद होते

### काढणी व साठवणूक

कांद्याची पाने वाकू लागतात, यास मान मोडणे म्हणतात. ५० टक्के माना वाकल्यावर ७-८ दिवसांनी काढणी करावी. काढणीनंतर कांदे पातीसकट शेतात २-३ दिवस उन्हात सुकवावेत.

कमी तापमान किंवा दमट हवामान असल्यास कृत्रिम पद्धतीने ४६ अंश गरम हवा १६ तास सोडून सुकवता येते. योग्य सुकवणी आणि चाळीत साठवणूक केल्यास कांदा ४-५ महिने सुरक्षित राहतो.

### निष्कर्ष

रबी कांदा हे उच्च उत्पादनक्षम आणि साठवणक्षम पीक असून, शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास त्यातून जास्त नफा मिळू शकतो. योग्य जमीन, सुधारित वाण, समतोल खत व पाणी व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांची काळजी, शिफारस केलेल्या पद्धतीने लागवड व साठवणूक हे घटक पिकाच्या यशाचे आधारस्तंभ आहेत. वैज्ञानिक पद्धत अवलंबल्यास कांद्याची गुणवत्ता, टिकाऊपणा व बाजारभाव दोन्ही निश्चितपणे वाढतात.

• निशा रमेश थोरात
• वैभव बन्सोड
• डॉ. अरविंद मु. सोनकांबळे
विभाग प्रमुख, भाजीपाला शास्त्र विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.

---

## काढणीनंतरची अभियांत्रिकी

कृषी अभियांत्रिकी

# शेतकऱ्यांसाठी अन्न वाया जाणे थांबविण्याचे नवे तंत्र





भारत हा कृषिप्रधान देश असून येथील बहुतांश जनता शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी कष्टाने उत्कृष्ट पिक उगवतात, पण नंतर योग्य पद्धतीने साठवण न केल्यामुळे धान्य, फळे-भाज्या यांचे जवळजवळ २०-३० टक्के नुकसान होते, कारण योग्य रीतीने व्यवस्थापना व प्रक्रिया केलेली नसते. हे नुकसान शेतकऱ्यांच्या कष्टाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेचंही नुकसान आहे. म्हणूनच 'काढणीनंतरची अभियांत्रिकी' हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे ठरते. या क्षेत्रातील नवकल्पना आणि तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे चांगले संवर्धन करणे आणि बाजारात जादा भाव मिळवून देणे शक्य होते.

### काढणीनंतरची अभियांत्रिकी

म्हणजे पीक कापल्यानंतर ते योग्य रीतीने साठवण, प्रक्रिया, वाहतूक आणि विक्रीपर्यंतच्या सर्व टप्प्यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून अन्नधान्याची गुणवत्ता टिकवणे आणि नुकसानीला आळा घालणे.

### अन्न वाया जाण्याची कारणे :

**१. अयोग्य कापणी :** योग्य वेळेपूर्वी किंवा नंतर कापणी, चुकीची साधने किंवा ओलसर हवामानामुळे पीक खराब होते. उदा.: अपूर्ण पिकलेला मका साठवणुकीत बुरशीयुक्त होतो.

**२. साठवणुकीतील त्रुटी :** तापमान व आर्द्रतेचा अभाव, असुरक्षित ठिकाणे आणि वीज नसल्याने कीटक-बुरशीचा प्रादुर्भाव होतो. उदा.: उष्ण ठिकाणी ठेवलेले बटाटे अंकुरतात व सडतात.

**३. वाहतूक नुकसान:** अयोग्य वाहतूक साधने, लांब प्रवास व तापमान बदलांमुळे उत्पादन दबते किंवा कुजते. उदा.: टमाटे थरथरत्या ट्रकमध्ये फाटतात.

**४. अयोग्य प्रक्रिया :** वेळेवर प्रक्रिया न केल्यास उत्पादन सडते; प्रक्रिया उद्योगाशी जोडणी नसल्याने बाजार मिळत नाही. उदा.: आंबे वेळेवर आमसुलं किंवा रस न बनवल्यास सडतात.

**५. बाजार व्यवस्थापनातील समस्या :** मागणीपेक्षा पुरवठा जास्त, अयोग्य बाजार निवड व मध्यस्थांमुळे नुकसान होते. उदा.: कांद्याची जास्त आवक झाल्यास शेतकऱ्यांचे कांदे वाया जातात.

**६. हवामान बदल :** अनपेक्षित पाऊस, गारपीट, उष्णतेच्या लाटा यामुळे उत्पादन खराब होते.

**उदा.:** अवकाळी पावसाने सुकवलेले धान्य ओलसर होऊन सडते.

काढणीनंतरची काळजी योग्य घेतल्यास अन्ननासाडी कमी होते, शेतकऱ्यांना चांगले दर मिळतात आणि अन्नसुरक्षेला हातभार लागतो.

### शेतकऱ्यांसाठी अन्न वाया जाणे थांबवण्याची नवी तंत्रे :

**१. सौरऊर्जेवर चालणारे थंड साठवणगृह :** सौरऊर्जेवर चालणारे कोल्ड स्टोरेज ४० अंश-१० अंश तापमान राखते, त्यामुळे फळे-भाज्यांचे आयुष्य ५ ते १० पट वाढते. वीज खर्च कमी व पर्यावरणपूरक. उपयोग : टोमॅटो, भेंडी, बटाटा, फळे, दूध, अंडी व इतर जास्त नासणाऱ्या वस्तूंसाठी उपयुक्त. वीज खर्च वाचतो आणि प्रदूषणही होत नाही.

**२. बायो-फ्रेश कोटिंग :** फळांवर नैसर्गिक पदार्थांचा थर लावून ऑक्सिजनची देवाण-घेवाण नियंत्रित केली जाते, ज्यामुळे ते जास्त दिवस ताजे राहतात. उदा.: आंबा, सफरचंद, डाळिंब.

**३. स्वयंचलित ग्रेडिंग व पॅकिंग :** फळे-भाज्यांची आकार, रंग, वजनानुसार स्वयंचलित विभागणी व आकर्षक पॅकिंग. दर्जेदार मालाने अधिक किंमत व वेळेची बचत. उपयोग : बाजारात दर्जेदार माल म्हणून अधिक किमतीने विक्री होते, मानवी श्रम कमी होतो आणि वेळ वाचतो.

**४. सौर वाळवण गृह :** सौर ऊर्जेने फळे, भाज्या, मसाले स्वच्छतेने वाळवता येतात; रंग, चव व गंध टिकतो. उदा.: आमसुलं, हळद, आले, टोमॅटो.

**५. मोबाईल कोल्ड स्टोरेज व रेफ्रिजरेटेड वाहतूक :** कोल्ड ट्रकद्वारे माल ताजाच बाजारात पोहोचवता येतो. निर्यातक्षम उत्पादनासाठी उपयुक्त. उपयोग : अंतर जास्त असलेल्या बाजारासाठी, निर्यातक्षम उत्पादनासाठी आवश्यक.

**६. डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे थेट विक्री :** 'फार्म-टू-फोर्क' ॲप्समुळे शेतकरी थेट ग्राहकांशी व्यवहार करतो, मध्यस्थांशिवाय अधिक नफा मिळतो. उपयोग : मध्यस्थांशिवाय जास्त नफा मिळतो, उत्पादन विक्रीसाठी जलद आणि खात्रीशीर मार्ग.

**७. लहान प्रमाणात प्रक्रिया युनिट्स :** लोणचं, जॅम, रस इत्यादी तयार करून उत्पादन टिकवता येते व स्थानिक रोजगार वाढतो. उपयोग : फळे व भाज्यांना प्रक्रिया करून जास्त दिवस टिकवणे, अधिक किमतीला विक्री.

### शेतकऱ्यांना मिळणारे फायदे :

- उत्पादनाचा जास्त काळ टिकाव.
- विक्रीसाठी जास्त पर्याय (ताजी विक्री, प्रक्रिया उद्योगाला विक्री).
- वाहतूक व साठवण खर्चात बचत.
- बाजारातील मागणी व दर यांचे योग्य नियोजन.
- एकूण उत्पन्नात २०-३० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची संधी.

### सरकारच्या योजना व मदत

प्रधानमंत्री किसान संपदा योजना, क्रेडिट गॅरंटी योजना, ऑपरेशन ग्रीन्स, कृषी अभियांत्रिकी, किसान क्रेडिट कार्ड, ई-नाम आणि मेगा फूड पार्क या सरकारी योजना शेतकऱ्यांना काढणीनंतरच्या टप्प्यात साठवण, प्रक्रिया, वाहतूक, विपणन, आर्थिक साहाय्य व आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देतात. त्यामुळे अन्ननासाडी कमी होऊन उत्पन्न व रोजगार वाढतो. या योजनांमुळे शेतकरी उत्पादन कार्यक्षमतेने साठवू, प्रक्रिया करू व विक्री करू शकतात. आजच्या स्पर्धेच्या युगात काढणीनंतरचे व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे. सरकार व संशोधन संस्था प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि तांत्रिक सल्ला देत आहेत. म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करा, अन्न वाचवा आणि नफा वाढवा! हेच आजच्या काळाचे मंत्र आहे.

• पुनम वि. काकडे
• काव्या पेंद्रम
आचार्य पदवी विद्यार्थिनी, प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
• डॉ. मयुर पो. कराटे
सह. प्रा. , प्र. व. अ. अभियांत्रिकी, कृ. अ. व. तां. महाविद्यालय , मालेगाव

---

कृषी हवामान

# राज्यात आता थंडीचा कहर

मागील आठवड्यात दिलेल्या अंदाजानुसार ईशान्य मान्सूनला ब्रेक लागला, तर बऱ्याच ठिकाणी थंडीची लाट बघावयास मिळाली. आता बघूया पुढील हवामान परिस्थिती-

### भौगोलिक स्थिती

सध्या बंगालच्या उपसागराच्या मध्यवर्ती भागात एक वरच्या हवेचे चक्राकार वारे निर्माण झाले आहेत, जे समुद्रसपाटीपासून सरासरी ३.१ किमी उंचीवर पसरले आहे. आणखी एक चक्राकार वारे दक्षिण बांगलादेश आणि लगतच्या गंगेच्या पश्चिम बंगालवर आहे, जो समुद्रसपाटीपासून १.५ किमीपर्यंत पसरलेला आहे.

तिसरा प्रवाह (हवेचा दाब) उत्तर अंतर्गत तामिळनाडूवर समुद्रसपाटीपासून सरासरी ३.१ किमीवर कायम आहे, तर समुद्रसपाटीपासून सरासरी ३.१ किमी उंचीवर उत्तर हरयाणावर एक पश्चिमी विक्षोभ आहे. या सर्व कारणांनी आता राज्यात पावसाची शक्यता कमी आणि थंडीचे प्रमाण वाढताना दिसेल.

**विदर्भ साप्ताहिक हवामान :**

- १२-१९ नोव्हेंबर दरम्यान संपूर्ण वातावरण कोरडं आणि रात्रीला थंडी जाणवणार. सरासरी तापमान किमान २५ अंश ते कमाल १२ अंशापर्यंत येईल. आठवड्यात शेवटी हलकी ढगाळ परिस्थिती राहू शकते, पावसाची शक्यता नाही.
- **उत्तर महाराष्ट्र :** मागील आठवड्यात जळगाव जिल्ह्याचा पारा १० अंशवर आला असता, पुन्हा १२-१९ नोव्हेंबर दरम्यान संपूर्ण वातावरण कोरडं आणि रात्रीला थंडी जाणवणार. सरासरी तापमान किमाण २५ अंश ते कमाल १२ अंशापर्यंत येईल.
- **मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र :** संपूर्ण सप्ताहात वातावरण कोरडं आणि थंडी जाणवणार, तापमान सरासरी २८ अंश ते १४ अंशापर्यंत राहण्याची शक्यता. आठवड्यात शेवटी हलकी ढगाळ परिस्थिती राहू शकते.

पुढील आठवड्यात दक्षिणेकडील कमी दाब प्रभावामुळे ढगाळ परिस्थिती जाणवू शकते.

**शेतकऱ्यांना सूचना :** ही वेळ पेरणीयोग्य असल्यामुळे आणि वेळ निघाल्यावर उतारा कमी येईल म्हणून गहू, हरभरा, ज्वारी, मका पेरणीला सुरुवात करावी.

• अभिषेक सु. खेरडे
हवामान अभ्यासक, अचलपूर

---

कीड व्यवस्थापन

# तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीचे व्यवस्थापन



तूर पीक सद्यस्थितीत कळी व फुलोरा अवस्थेत असून, त्यावर शेंगा पोखरणाऱ्या किडीची अंडी तसेच लहान अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. थंड हवामान व ढगाळ वातावरण हे तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या वाढीस पोषक आहे. शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळून आल्यास उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. त्याकरिता शेतकरी बांधवांनी पिकाचे निरीक्षण करून शेंगा पोखरणाऱ्या अळीकरिता एकात्मिक व्यवस्थापनासंबंधी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### किडीची ओळख व जीवनक्रम

शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांमध्ये हेलीकोव्हर्पा या किडीची मादी पतंग तुरीच्या कळ्या, फुले व शेंगांवर पिवळसर-पांढऱ्या रंगाची अंडी घालतात. पूर्ण वाढ झालेली ही अळी ३० ते ४० मि.मी. लांब, हिरवट, पोपटी व करड्या रंगाची असून, तिच्या पाठीवर तुटक करड्या रेषा असतात. अंडी अवस्था ४ ते ७ दिवस, अळी अवस्था १४ ते १६ दिवसांची असून, पूर्ण वाढ झालेली अळी झाडाच्या बुंध्याजवळ जमिनीत मातीच्या वेष्टनात कोषावस्थेत जाते. कोषातून पतंग बाहेर पडतात. अशा प्रकारे या कीडीचा जीवनक्रम ४ ते ५ आठवड्यांत पूर्ण होतो. या कीडीच्या वर्षभरात ७ ते ९ पिढ्या तयार होतात.

### प्रादुर्भाव

अंड्यातून निघालेल्या अळ्या कळ्या व फुलांना छिद्र पाडून कुरतडतात, त्यामुळे सुरुवातीच्या अवस्थेत तूर पिकाचे अतोनात नुकसान करतात. त्यानंतर शेंगांना अनियमित पणे मोठ्या आकाराचे छिद्र पाडून शेंगांची अपरिपक्व तसेच परिपक्व दाणे खाऊन नुकसान करतात. ही अळी साधारणतः ६ ते १६ शेंगांचे नुकसान करते. ही कीड तुरीवर नोव्हेंबर ते मार्चपर्यंत क्रियाशील असते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात ढगाळ वातावरण असल्यास या कीडीचा प्रादुर्भाव वाढतो.

अळी कळ्या, फुले व शेंगांवर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनासाठी एकात्मिक उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी पूर्ण वाढ झालेल्या अळया हाताने वेचून नष्ट कराव्यात. हेक्टरी २० पक्षीथांबे पिकात उभारावेत. अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळून आल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे. त्यामुळे झाडावरील अळ्या पोत्यावर पडतील, त्या गोळा करून नष्ट कराव्यात.

### पहिली फवारणी

पीक ५० टक्के फुलोरा अवस्थेत असताना ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझॅडीरेक्टिन ३०० पीपीएम ५० मिली किंवा अझॅडीरेक्टिन १५०० पीपीएम २५ मिली किंवा एचएएनपीव्ही (१ बाय १०९ तीव्रता) ५०० रोगग्रस्त अळ्यांचा अर्क प्रती हेक्टरी फवारावा किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### दुसरी फवारणी

(पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इथिऑन ५० टक्के ईसी २० मिली किंवा लॅम्डा सायहलोथ्रिन ५ टक्के १० मिली किंवा फ्लूबेंडामाईड ३९.३५ एससी २ मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ईसी ७ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के एसजी ४ ग्रॅम किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एससी ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

• डॉ. नीलेश वझिरे
विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण)
• डॉ. जीवन कतोरे
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा, जि. वर्धा

---

कृषी संस्कृती



# मातीतील संस्कृती, भाषेतील वारसा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. हजारो वर्षांपासून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, संपूर्ण जीवनपद्धतीचा आधार आणि समाजव्यवस्था, परंपरा आणि संस्कृतीचा पाया आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवी जीवनाच्या मूलभूत गरजांचा केंद्रबिंदू शेती आहे. शेतीवर आधारित संस्कृतीमुळे समाजाची परंपरा, श्रद्धा, सण-उत्सव आणि लोककला यांची निर्मिती झाली. म्हणूनच कृषी संस्कृती ही भारतीय संस्कृतीचा गाभा मानली जाते.

### कृषी संस्कृतीचा इतिहास

भारतातील कृषी संस्कृतीचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातही शेती हा मुख्य व्यवसाय होता. नदीकाठच्या सुपीक जमिनीवर गहू, ज्वारी, तांदूळ यासारखी पिके घेतली जात होती. संस्कृत भाषेत कृषीविषयक संज्ञा मोठ्या प्रमाणावर आढळतात. कृषी हा शब्दच संस्कृतमधील कृष या धातूपासून आलेला आहे, ज्याचा अर्थ नांगरणे किंवा शेती करणे असा होतो. यावरून स्पष्ट होते की, कृषी आणि भाषा यांचा संबंध प्राचीन काळापासून घट्ट आहे.

### कृषी आणि समाजजीवन

भारतीय समाजात शेतकरी हा समाजाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक रचनेचा आधार आहे. शेतीच्या कामात ऋतूचक्र, निसर्ग आणि समाज यांचा सुंदर संगम दिसतो. पावसासाठी प्रार्थना करणे, पेरणीच्या आधी पूजा करणे, कापणीच्या वेळी उत्सव साजरे करणे या सगळ्या गोष्टी शेतीभोवतीच फिरतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील मकर संक्रांत, बैल पोळा, येळवस (दर्श वेळ अमावस्या), गुढीपाडवा हा सन रबी हंगामाच्या पीक समाप्तीचे प्रतीक आहे. गावात जत्रा, मेळे, बैलगाडा शर्यती, भजन-कीर्तन यातूनही कृषी संस्कृती प्रकट होते. शेतकरी आपले भावविश्व, आशा, भीती आणि श्रद्धा लोकगीतांमधून व्यक्त करतो. त्यामुळे कृषी ही केवळ अन्ननिर्मितीची प्रक्रिया नसून, ती एक जिवंत लोकसंस्कृती आहे.

### कृषी संस्कृतीचा भाषेशी संबंध

कृषी संस्कृती आणि भाषेचा संबंध अतिशय खोल आणि बहुआयामी आहे. शेती ही मुळात ग्रामीण भागात फुललेली असल्यामुळे प्रादेशिक भाषांमध्ये तिची परंपरा जपली गेली आहे. प्रत्येक प्रदेशातील शेतकऱ्याने आपापल्या मातृभाषेतूनच कृषीविषयक ज्ञान पिढ्यान्‌पिढ्या पुढे दिले.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांमध्ये पेरणी, खुरपणी, निंदणी, मळणी, ओंबी, रोपे, पाणी सोडणे, वाफसा, कुळवणी, विळा, कुळव, बियाणे अशा संज्ञा प्रचलित आहेत. यामुळे कृषी संस्कृती स्थानिक भाषेशी घट्टपणे जोडली गेली आहे.

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृती जपण्याचे, पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान जसे की, ऋतूनुसार पेरणीची वेळ, पाण्याचे व्यवस्थापन, पीकसंवर्धन, रोगनियंत्रण हे सर्व मौखिक परंपरेतूनच पुढे आले आहे. या परंपरेत स्थानिक बोली भाषांचा विशेष वाटा आहे. त्याशिवाय लोकगीतं, म्हणी, कवितांमध्ये कृषीचा उल्लेख मोठ्या प्रमाणात होतो. उदाहरणार्थ, मराठीतल्या काही म्हणी शेतीशी थेट जोडलेल्या आहेत पेरलं तसं उगवेल, शेतात पाणी नसेल, तर मेहनत वाया जाते. मढ झाकुनी करती पेरणी अशा आपल्या मराठीतील म्हणी शेतीच्या कामाची प्राथमिकता सांगतात, जगण्याची, लढण्याची प्रेरणा देतात, ते काम हिंदी इंग्रजी करू शकत नाही.

यामुळे कृषी संस्कृतीला भाषिक समृद्धी लाभली आहे. त्याबरोबरच संयुक्त राष्ट्राने स्थानिक भाषा दशक हे २०२२ ते २०३२ पर्यंतसाठी जाहीर केले आहे. ज्याचा उद्देश जगभरातील लुप्तप्राय स्थानिक भाषांचे जतन, पुनरुज्जीवन आणि प्रोत्साहन देण्यासाठी लक्ष वेधणे आणि कृती करणे हे आहे.

### बीज माता

शेतीविषयक काही परंपरागत ज्ञान लोप पावत चालले आहे. देशी वाण, वनस्पती नष्ट होत आहेत, आसपासच्या वनस्पती, पाने, फुले, पशू-पक्षी, याविषयी आपले एक परंपरागत आकलन आहे, जे आपल्या भूभागाशी संबंधित असल्याने ते आपल्या भाषेत आहे, परंतु आपली भाषाच हळू हळू इतर भाषेच्या संक्रमणामुळे नष्ट होत गेली, तर हे परंपरागत ज्ञान आणि भाषा ही संपुष्टात येईल.

बारा कोसाला पाणी आणि जमिनीचा पोत बदलतो तसेच कृषी पद्धतीही बदलते. शेतीचे ज्ञान पुढच्या पिढीला देण्यासाठी मातृभाषाच सर्वोत्तम आहे. मातृभाषा कमकुवत झाली, तर नव्याचा आणि जुन्याचा मेळ घालणे अवघड होते. शेतीच्या कल्पना समजावून घेणे आणि नव्या गोष्टी शिकणे यासाठी मातृभाषेशिवाय पर्याय नाही. परक्या भाषेचा पर्याय म्हणजे उंटावरून शेळ्या हाकणे आहे. शेती फक्त व्यवसाय नाही, तर ती एक पूर्ण जीवनशैली आणि संस्कृती आहे. संस्कृती ही प्रवाही असली तरच ती टिकते. संतांकडून वारकऱ्यांना असो किंवा विद्यापीठांकडून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत असो या प्रवाहाचे सर्वोत्तम मध्यम हे मातृभाषाच आहे.

• अक्षय अ. शेळके
स. प्राध्यापक आ. कृ. महाविद्यालय, मानेगाव (माढा)

## अग्रलेख...

# 'हे' मरतात आणि 'ते' घोरतात!

मेळघाटात लहानगी बालके, गर्भवती आणि स्तनदा माता मरतात. पश्चिम विदर्भात शेतकरी मृत्यूला कवटाळतात. तरीही आपण समजायचे की, महाराष्ट्रात सारे आबादीआबाद आहे! नेते भाषणे देतात, उद्घाटने, भूमिपूजने करतात, सत्कार स्वीकारतात आणि नोकरशाही तिच्या साऱ्याच बाशिंद्यांसह थेट घोरत असते. शेतकऱ्यांचे आणि कुपोषित बालकांचे मृत्यू इतके 'नॉर्मल' झाले आहेत की, त्याची कुणालाच लाज वाटत नाही आणि कुणाला साधी खंतही नाही. मेळघाटात गेल्या जूनपासून ६५ बालके कुपोषणामुळे मेली. त्यांचे वय सहा महिन्यांच्या आत. त्यावर उच्च न्यायालयाने पुन्हा सरकारला सुनावले. पण, सरकारी यंत्रणांचे कान बहिरे झाले आहेत. दोनेक दशकांपासून न्यायालय आदेश देत आहे. पण, शासन नुसत्या समित्या नेमत आहे. निधी मंजूर होतो, परंतु मेळघाटातला हा प्रश्न सोडविण्यासाठी काहीही चांगले घडत नाही. शेतकऱ्यांचीही तीच परिस्थिती. हे पॅकेज, ते पॅकेज, कर्जमाफी वगैरेचे आश्वासन. पण, त्यांनाही शेवटी मृत्यूशीच दोस्ती करावी लागते. इतके लाख किंवा हजार कोटींची गुंतवणूक आली, कृत्रिम बुद्धिमत्तेचे इतके प्रकल्प आले, इतके हजार रोजगार निर्माण होत आहेत. महाराष्ट्रात सर्व आबादीआबाद होणार आहे, अशा बातम्या रोज आपण वाचतच असतो. त्याच महाराष्ट्रात यवतमाळ जिल्हा आहे. त्याच महाराष्ट्रात मेळघाट आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे रोज अश्रूंचे पाट वाहत आहेत आणि दुसरीकडे कोवळ्या जिवांच्या मृत्यूचा आर्त आकांत आहे. मेळघाट हा जंगलांनी वेढलेला, निसर्गाने समृद्ध, पण उपेक्षित असलेल्या जिवांचा प्रदेश. या भागात आजही बालकाचा जन्म म्हणजे एका धोकादायक प्रवासाची सुरुवात असते. कुपोषण, अन्नटंचाई, आरोग्यसेवेचा अभाव, पाण्याची कमतरता आणि ढिसाळ सरकारी यंत्रणा या साऱ्यांनी मिळून साकारलेले नवजातांचे थडगे म्हणजे मेळघाट. विदर्भात शेतकरी आत्महत्यांची तर आपल्या साऱ्यांना सवयच झाली आहे. शेतकऱ्यांचे मरण आता दुःखद किंवा चिंताजनक 'घटने'त मोजले जात नाही, तर दिनक्रमात मोजले जाते.

गेल्या १० महिन्यांत पश्चिम विदर्भात सुमारे ९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. ऐन दिवाळीत तब्बल ८७ शेतकऱ्यांनी मरण पत्करले. १ जानेवारी २००१ पासून आजपर्यंत २२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. म्हणजे दर आठ तासांनी एक शेतकरी स्वतःचे जीवन संपवतो आहे; तरीही महाराष्ट्रात सारे काही आबादीआबाद आहे! आरोग्य विभाग बालमृत्यू रोखण्यात अपयशी. कारण तो स्वतःच आजारी आहे. महिला व बालकल्याण विभागाला त्यांच्या नावातील 'कल्याण' या शब्दाचा अर्थही माहिती नाही. आदिवासी विकास विभागाला 'विकास' कशाशी खातात हे ठाऊक नाही. महसूल विभागाला कामे खूप, पण निष्पन्न शून्य. ग्रामीण विकास विभाग फक्त नावापुरता 'ग्रामीण' आहे. या साऱ्यांतून मेळघाट घडत असते. कुपोषित बालकांचे जीव वाचवण्यासाठी पोषण आहार योजना सुरू झाली. पण बालकांच्या-मातांच्या पोषणाच्या ऐवजी भ्रष्टाचार वाढला. पोषक अन्नाच्या डब्यातून ठेकेदारांना मोठे घबाड गवसले. शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आल्या, येत असतात. तिथेही ठेकेदारांचे, अधिकाऱ्यांचे खिसे भरले जातात. मेळघाटात अजूनही जवळपास ४० टक्क्यांहून अधिक बालके कुपोषित आहेत. मातांच्या मृत्यूचा दर अजूनही राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. तज्ज्ञांचे म्हणणे असे की, बालकाच्या जीवनातील आरंभीचे एक हजार दिवस फार महत्त्वाचे असतात. म्हणजे एक सशक्त बाळ आकाराला येण्यासाठी ते किमान तीन वर्षे स्वस्थ स्वरूपात जगले पाहिजे. दोन वर्षांच्या वयापर्यंत बालकाच्या मेंदूचा सुमारे ८० टक्के विकास होतो. पण, तेवढा काळ ते स्वस्थ स्वरूपात जगले तर ना! मेंदूच्या विकासात त्याच्या पुढच्या आयुष्याची पायाभरणी होते. त्यामुळे बालकांना सुरुवातीच्या काळातच चांगले पोषण, आरोग्य सेवा आणि चांगले वातावरण मिळाले पाहिजे. एका संशोधनात असे आढळले होते की, भारतातील पाच वर्षांच्या आतील सुमारे १४ कोटी मुलांपैकी ३५ टक्क्यांहून जास्त मुलांचे वजन अपेक्षेपेक्षा कमी आहे. यात मेळघाटातील बालके असणारच. शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्र गेल्या अनेक वर्षांपासून देशात पहिल्या क्रमांकावर आहे. केंद्र आणि राज्य सरकार हजारो कोटींचा निधी खर्च केल्याचा दावा करतात. पण त्याचा प्रत्यक्ष परिणाम कुठे दिसतो? शेतकऱ्यांचा कर्जबोजा कमी झाला का? मेळघाटातील बालकांचे मृत्यू थांबले काय? मग एवढा पैसा गेला कुठे? सरकारी यंत्रणा निष्क्रिय आणि उदासीन आहे. समाजही तितकाच असंवेदनशील झालाय. आत्महत्या किंवा कुपोषणाची बातमी सामोरी आली की आपण पुढच्या पानाकडे वळतो. शेतकरी-बालके तडफडत मरतात. यावरचे उपाय साऱ्यांना माहिती आहेत. त्यांची उजळणी कित्येकदा झालेली आहे. फक्त ते करायचे कुणी, हा प्रश्न अजून शिल्लक आहे. दरवेळी कुठल्या तरी पुढाऱ्याच्या किंवा महात्म्याच्या नावाने एखादी योजना जाहीर होते. अभियानाची घोषणा होते. त्याची घोषवाक्ये बनतात. गुळगुळीत बॅनर्स, पोस्टर्स तयार होतात. कार्यक्रम होतात. सत्कार आणि हारतुरे होतात. पण, सुदूर आदिवासीबहुल भागातले नवजात बालक पोषणासाठी तडफडत असते. शेतकरी हवालदिल झालेले असतात. त्यांच्यापर्यंत कुणीही पोहोचत नाही. सत्तेत बसलेली सारीच शेतकऱ्यांची मुले आहेत म्हणे. सारीच कधी तरी बालक स्वरूपात जन्माला आली होती. तरीही त्यांच्याकडे संवेदना नाहीत. न्यायालयाला दरवेळी सरकारी यंत्रणांच्या संवेदना जाग्या करण्याचा प्रयत्न करावा लागतो. मुख्य सचिव आणि सचिवांना बत्ती द्यावी लागते. आता ही धाटणी बदलली पाहिजे. शेतकरी आत्महत्या करीत राहतील आणि कुपोषित बालके मरत असतील तर त्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेतील प्रत्येक संबंधित पदाधिकारी-अधिकारी-कर्मचाऱ्यावर टाकली गेली पाहिजे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसह समस्त यंत्रणेला अशा एकेका मृत्यूसाठी जबाबदार धरले पाहिजे. चौकशा लावून त्यांना दंडित केले पाहिजे. बाकीचे उपाय कामाला येत नसतील तर आता सरकारी यंत्रणेला अशाप्रकारे जबाबदार ठरविणे हाच पर्याय उरतो. कारण त्यांची ढिसाळ कार्यपद्धती महाराष्ट्रासाठी अजिबात भूषणावह राहिलेली नाही. महाराष्ट्र हे समृद्ध राज्य आहे, असे म्हणतात. ते प्रगतिशील आहे, असेही म्हणतात. मग त्याच महाराष्ट्राला शेतकऱ्यांच्या आणि कोवळ्या जिवांच्या मृत्यूची सवय होते, याला काय म्हणायचे? शेतकरी आणि कुपोषित बालके मरत असतात आणि सरकारी यंत्रणेतले सारे घटक घोरत असतात, यावर कोणता उपाय करायचा? महाराष्ट्र प्रगतिपथावर असेल तर आत्महत्येला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कुपोषणाने मरत असलेल्या कोवळ्या जिवांचा या प्रगतीवर हक्क नाही काय? त्यांना जगावेसे वाटत नसेल काय? प्रश्न अनेक आहेत. पण, कुणालाच या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी सवड नाही. ज्या समाजात मृत्यूंच्या बातम्या 'रूटीन' समजल्या जातात, त्या समाजात जगण्याचे महत्त्व कमी-कमी होत जाते. शेतकरी आणि बालके यांच्या मृत्यूंची पृष्ठभूमी एकच असली, तरी त्याची कारणे सरकारी यंत्रणेच्या उदासीनतेत, नाकर्तेपणातच दडलेली आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना फक्त वेतन आयोगांचे फायदे हवेत. भत्ते हवेत, सोयी-सवलती हव्यात. जबाबदारी कोणतीच नको. ज्यांनी त्यांच्यावर जबाबदारी टाकायची किंवा त्यांना जबाबदार ठरवायचे किंवा कामाचा हिशेब मागायचा, ते स्वतःच्या विश्वात मश्गूल आहेत. आम्ही निधी दिला म्हणजे इतिकर्तव्य पूर्ण झाले, हाच या साऱ्यांचा आविर्भाव असतो. पैशाने सगळे प्रश्न सुटले असते तर मेळघाटात एकही मूल मरण्याचे कारण शिल्लक राहिले नसते. पॅकेजने शेतकऱ्यांची स्थिती सुधारायची असती तर एव्हाना आत्महत्यांचे सत्र थांबून गेले असते. आजही मेळघाटात एखादं बाळ तडफडत असेल आणि यवतमाळ जिल्ह्यात एखादा शेतकरी शेवटचे पत्र लिहीत असेल तर दोष कुणाला द्यायचा? 'आमच्यासाठी काहीतरी करा' अशी दोघांचीही आर्त हाक असते. त्याला खऱ्या अर्थाचा प्रतिसाद देणारे मात्र कुणीही नाही. कारण त्यांच्या कोरड्या प्रतिसादात 'आम्ही निधी दिला, आम्ही प्रयत्न करतोय' यापलीकडे सांगण्यासारखे काहीही नाही. हे इकडे मरत असतात आणि ते तिकडे घोरत असतात...! कुठवर?

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# क्रिकेटमध्ये आधुनिक तंत्रज्ञान

क्रिकेट हा खेळ प्राचीन काळापासून खेळला जात असून, कालौघात त्यामध्ये अनेक बदल झाले आहेत. एकीकडे खेळाची गती वाढली, तशीच प्रेक्षकांची अपेक्षा आणि निर्णायकतेबाबतची अचूकताही वाढली. या बदलत्या गरजांमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर क्रिकेटमध्ये वाढू लागला. आजच्या घडीला, क्रिकेट सामन्यांमध्ये तंत्रज्ञानाची भूमिका इतकी महत्त्वाची झाली आहे की त्याविना अचूक निर्णय, विश्लेषण किंवा प्रेक्षकांना उच्च दर्जाची अनुभूती देणे अशक्यप्राय झाले आहे. क्रिकेटमध्ये १९९० च्या दशकात तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला, परंतु त्याचा खरा प्रभाव २००० नंतर दिसून आला. सुरुवातीला हा बदल फक्त थोड्या प्रमाणावर रिप्ले दाखवणे, स्कोअरकार्ड इलेक्ट्रॉनिक करणे इतपत मर्यादित होता. परंतु टीव्ही प्रक्षेपण व्यावसायिक होत गेले, तसे डीआरएस, हॉक-आय, अल्ट्रा एज, बॉल ट्रॅकिंग यांसारख्या प्रगत प्रणाली क्रिकेटचा अविभाज्य भाग बनल्या. आता त्यापुढची पायरी म्हणजे कुकाबुरा स्मार्ट बॉल. आजचे क्रिकेट 'डेटा-ड्रिव्हन' झाले आहे. बॉलचा वेग, स्विंग, बाऊन्स, स्पिन हे सर्व डेटा रूपात संकलित करून विश्लेषण केले जाते. याच पृष्ठभूमीवर 'कुकाबुरा स्मार्ट बॉल' हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान समोर आले आहे. या बॉलने क्रिकेटमध्ये अचूक मोजमाप, फिटनेस मोजणी आणि डेटा ॲनालिटिक्सला नव्या उंचीवर नेले आहे. हल्ली सामन्याप्रसंगी चढाओढ इतकी वाढते की एक एक चेंडू आणि एक एक धाव निर्णायक ठरते. त्यासंदर्भातील निर्णयात थोडीशी चूक झाली तरी चांगले अंपायरिंग झाले नाही किंवा पक्षपातीपणा झाल्याच्या तक्रारी चाहत्यांकडून सहज केल्या जातात.

खेळात कटुतेला स्थान नसावे आणि खेळीचे, नियमांचे चोख मूल्यमापन व्हावे या दृष्टीने काही नवी तंत्रे आकाराला येत असल्यास स्वागतच व्हायला हवे. त्या दृष्टीने पाहता कुकाबुरा स्मार्ट बॉल हे तंत्रज्ञानाने क्रिकेटच्या जगात टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हणता येते. हे एक खास तंत्रज्ञान आहे. पारंपरिक खेळाला आधुनिक डेटा ॲनालिटिक्सची जोड देऊन या बॉलने खेळाडूंच्या प्रशिक्षणाची पद्धत, प्रेक्षकांचा सामना पाहण्याचा, रसग्रहण करण्याचा अनुभव आणि सामन्यांच्या निर्णयाचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची क्षमता दाखवली आहे. कुकाबुरा स्मार्ट बॉल हा एक विशेष बॉल आहे, ज्यामध्ये अत्याधुनिक सेन्सर टेक्नॉलॉजी वापरली आहे. पारंपरिक बॉलप्रमाणे दिसणारा हा बॉल आतून अत्यंत तंत्रसमृद्ध आणि बुद्धिमान आहे. या बॉलमध्ये स्मार्ट चिप्स आणि सेन्सर बसवलेले असतात, जे बॉलच्या प्रत्येक हालचालीची माहिती संकलित करतात. हे तंत्र कुकाबुरा कंपनी आणि स्पोर्टकोर नावाच्या ऑस्ट्रेलियन स्टार्टअपच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित झाले आहे. बॉलच्या आतमध्ये लपवलेले हे सेन्सर बॉलच्या वेगापासून बॉलिंग ॲक्शनपर्यंत अनेक गोष्टी मोजतात. अशा या कुकाबोरा स्मार्ट बॉलमध्ये नेमके काय असते, याचा वेध घेऊ. त्यात सर्वांत महत्त्वाचे असते ते मायक्रो सेन्सर युनिट. बॉलच्या कोअरमध्ये बसवलेले हे युनिट बॉलचा वेग, गती, फिरकी, बाऊन्स यांसारख्या क्रियांचा डेटा संकलित करते. त्याखेरीज असते ते ब्लूटूथ टान्समीटर. हा ट्रान्समीटर बॉलमधून संकलित झालेला डेटा जवळील डिव्हाईस (स्मार्टफोन, टॅबलेट, संगणक)ला वायरलेस पद्धतीने पाठवतो.

या तांत्रिक सक्षमतेमुळे खेळाच्या अनेक टप्प्यांमध्ये नेमकी खेळी तपासून, उलगडून पाहायला मदत होते. याखेरीज यात एक लहान बॅटरी असते, जी बॉल अनेक तास वापरला, तरी टिकते. ही बॅटरी बदलता येते किंवा रिचार्ज करता येते. गंमत म्हणजे हा बॉल मोबाईल ॲपशी संलग्न असू शकतो. कुकाबुरा स्मार्ट बॉलसाठी खास ॲप उपलब्ध आहे. यामध्ये बॉलिंग आणि गोलंदाजांची पूर्ण माहिती रिअल-टाईममध्ये दिसते. त्याचे काही प्रमुख फायदे लक्षात घ्यायला हवेत. पहिला महत्त्वाचा फायदा म्हणजे रिअल टाईम डेटा आणि अचूक विश्लेषण उपलब्ध होणे. पारंपरिक बॉलमध्ये फक्त निरीक्षणावर आणि वेगाची मोजणी करू शकणाऱ्या साधनांवर अवलंबून राहावे लागत होते; पण स्मार्ट बॉलमुळे वेगाच्या प्रत्येक टप्प्यावर, फिरकीचे प्रमाण, सीमची स्थिती, बाऊन्स आणि बॉलवरील पॉवर यावर अचूक, डेटा क्षणार्धात मिळतो. प्रशिक्षणात विज्ञानाधारित सुधारणा पाहायला मिळते. प्रशिक्षक आणि खेळाडूंना बॉल रिलिज, सीम, स्पिन, बाऊन्स आदी तांत्रिक बारीकसारीक गोष्टी उलगडून पाहता येतात. त्यामुळे खेळीमधील त्रुटी ओळखणे, प्रशिक्षण पद्धती वैयक्तिककृत करणे आणि प्रगतीचा मागोवा ठेवणे सोपे जाते. यामुळे कौशल्य सुधारणा साध्य होते. गोलंदाजाला त्याच्या फिरकीचा वेग, गतीतील अचूक फरक आणि चेंडू सोडतानाचा सीमचा कोन लगेच कळतो. यामुळे आपल्या तंत्रात लगेच सुधारणा करता येते. परिणामी, लाईव्ह ब्रॉडकास्टवेळी प्रेक्षकांना खेळातल्या अचूक विश्लेषणाचा अधिक समृद्ध अनुभव मिळतो.

या तंत्राने सज्ज होणारी खेळी अचूक माहितीसह समोर येते. किंबहुना, फक्त डोळ्याला दिसणारा सामना पाहण्यापलीकडे जाऊन खेळाची वैशिष्ट्ये, गोलंदाजाची नेमकी कामगिरी आणि एखाद्या खेळाडूने दाखवलेले कसब अनुभवायला मिळते. लाईव्ह सामना पाहताना, बॉलवरून मिळणारी प्रत्येक माहिती, जसे की स्पीड, स्पिन, बाऊन्स थेट स्क्रीनवर दिसते. त्यामुळे प्रेक्षकांना सामन्यातील बारकावे आणि खेळाडूचे कौशल्य उत्तम समजते. यामुळे उच्च दर्जाचे अंपायरिंग आणि डीआरएस निर्णय आकाराला येऊ शकतो. इन-बॉल सेन्सर्समुळे माहिती घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिक अचूकता येऊन विश्वासार्हता प्राप्त होते. पायचित, कॅच किंवा सीमसंबंधित अगदी बारीक विवादांमध्ये बॉलचा ट्रॅक, बाऊन्स वगैरे माहिती अचूक करता येते. हा तपशील विकास आणि तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व समन्वय ठरतो. डेटा स्टोरेज आणि एआय बेस्ड विश्लेषणाने क्रिकेटमधील विविध संशोधन आणि निर्णय प्रक्रियेत मदत होते. खेळाच्या भूतकाळातील, वर्तमानातील आणि भविष्यकालीन ट्रेंड एकत्र करता येतात. अनेकदा खेळाडू अन्याय झाला (पंचानी चुकीचा निर्णय दिला) म्हणून हताश होतो. आता असे होणार नाही. दिला गेलेला निर्णय शंभर टक्के बरोबरच असेल. पंचांना याचा मोठा फायदा मिळू शकेल. वेस्ट इंडीज प्रीमियर लीगसारख्या स्पर्धांमध्ये त्याचा यशस्वी वापर झाला आहे आणि लवकरच हे तंत्र आयपीएल आणि इतर मोठ्या लीगमध्ये अधिक नियमितपणे दिसू शकते. कुकाबुरा स्मार्ट बॉलचा उपयोग केल्याने क्रिकेट सामन्याच्या प्रत्येक पातळीवर - प्रशिक्षण, सामना, निवड, ब्रॉडकास्ट आणि निर्णय ढाच्यात एक प्रगत, डेटा आधारित आणि विज्ञानाधारित युगाची सुरुवात होईल.

आज अनेक खेळांच्या लीग सुरू झाल्या आहेत. त्यांचे स्वरूप स्थानिक राहिलेले नाही, तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले आहे. क्रिकेटसारख्या खेळात तर प्रचंड पैसा गुंतलेला असतो. या खेळांच्या आयोजनात, सादरीकरणामध्ये येत असलेली व्यावसायिकता खास महत्त्वाची आहे. आज प्रेक्षकाकडून काही हजार रुपये वसूल केले जातात. ठरावीक सामन्याची उत्सुकता माध्यमांच्या मदतीने प्रचंड प्रमाणात वाढवली जाते. अगदी टीव्हीवर सामना पाहायचा झाला तरी ॲक्शन रिप्ले आणि हायलाईट्सच्या माध्यमातून सामन्याचा टर्निंग पॉईंट किंवा विशेष क्षणचित्रे खास पद्धतीने उलगडून दाखवली जातात. यातूनच मग कधी तरी नेटकेपणाने न घेतला गेलेला कॅच, गोलंदाजाने फेकल्यानंतर बॉलने घेतलेला स्विंग किंवा खेळाडूने कॅच घेताना किंवा थ्रो अडवताना सीमारेषेला केलेला- न केलेला स्पर्श याची अचूक माहिती मिळू शकते. या दृष्टीने क्रिकेटमध्ये येत असलेले नवतंत्रज्ञान महत्त्वाचे आणि लक्षवेधी आहे. कुकाबुरा बॉलमधील नवतंत्राने या संदर्भातील नवा अध्याय लिहायला घेतला आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# ट्रेंड भजन क्लबिंगचा!

आपण भारतीय पिढ्यान्‌पिढ्या संगीत आणि कलाप्रेमी आहोत. जन्मापासून मरणापर्यंतचा आपला प्रत्येक सोहळा गीत-संगीतबद्ध असतो. मात्र, टाळ-मृदुंगाच्या लयबद्ध ठेक्यावर 'राम कृष्ण हरी' म्हणत रंगणारे भजन आता, गिटार-ड्रमच्या फास्ट बिट्सवर वाजवले आणि गायले जात आहे. जेन झीने 'भजन क्लबिंग' असं ट्रेंडी नाव या भजन प्रकाराला दिले असून ही एक प्रकारची सांस्कृतिक पार्टी आहे. भजन क्लबिंग म्हणजे 'भजन संध्या' नाहीच; 'नाईट क्लब'ही नाही. या दोन टोकाचे सामूहिक एकत्रीकरण म्हणजे फ्यूजन नव्या पिढीने तयार केले आणि सध्या त्याचा छान ट्रेंड आला आहे. अगदी अलिकडेपर्यंत गाजलेल्या बॉलिवूड गाण्यांच्या चालींवर देवीचा जगराता, विविध आरत्या, मंत्र-स्तोत्रे आणि भक्तिगीते गाण्याचा ट्रेंड होता. आता या भजन-श्लोकांचाही रिमेक झाला आहे आणि तो सकारात्मक आहे.



हाय एनर्जी आणि ठेका धरायला बाध्य करणारे इलेक्ट्रॉनिक बिट्स म्हणजे 'भजन क्लबिंग'ची 'जान' आहे. कल्पना करा, वीकेण्डच्या पार्टीजमधला मंद प्रकाश, आरशासारख्या चमकदार भिंती आणि सोबत डिजेवर 'हरे रामा हरे कृष्णा'ची धून! नामसंकीर्तनात भक्त नाचतात हे आपण जाणतोच; पण क्लबमधल्या या वातावरणात आपली जेन झी फेर धरून, अगदी वेडावून नाचत आहेत. ही कमाल आध्यात्मिक शब्द पण लेटेस्ट म्युझिक वाद्यांमुळे होते आहे. कोणतेही मादक पदार्थ, मद्य न घेता चढलेली ही झिंग प्रभुनामाची आहे, हे अनुभवातूनच समजते. आपल्या संस्कृतीसोबतची नाळ अधिक घट्ट करण्याचा हा अफलातून प्रयोग 'कूल' ठरतो आहे. भजन क्लबिंग कोण्या एका व्यक्तीने किंवा क्लबने सुरू केलेली संकल्पना नाही तर भारतीय युवावर्गाच्या बदलत्या प्राथमिकता त्यातून स्पष्ट दिसतात. आपली सांस्कृतिक ओळख, अध्यात्माचा वारसा जपण्याचा प्रयत्न करणारी जेन झी! परंपरा आणि आधुनिक विचारांना जोडणारा पूल म्हणजे भजन क्लबिंग! वरवर पाहता कोरडी, असंवेदनशील वाटणाऱ्या पिढीसमोर फास्ट फॅशन आणि सांस्कृतिक बदलांमधून जाण्याचे तणावपूर्ण आव्हान आहे. हातात भरपूर पैसा असला, तरी स्पर्धेत टिकण्याचा 'स्ट्रेस' आहे. जगभरातील मैत्रीची साधनं असली, तरी 'पिअर प्रेशर' आहे. संयुक्त कुटुंबाचे आदर्श केवळ ऐकलेल्या या पिढीपुढे 'कल्चरल हसल' आहे. नातेसंबंधांच्या वेगळ्या अडचणी आणि समाजाकडून अपेक्षा आहेत, ज्या जेन झीच्या पचनी पडत नाहीत. प्रत्येक विचार बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहणारी ही पिढी, या नव्या मार्गाने तणावमुक्ती साधण्याचा प्रयत्न करतेय. तणावातून मुक्तीसाठी अमली पदार्थांना स्वयंस्फूर्तीने नकार देणारं हे युवावर्गाचे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. अशा ताणतणावाला तोंड देताना, ठेक्यावर गायली जाणारी भजनं, त्यांना एक आश्वासक 'ऑल इज वेल'चा अनुभव देत आहेत. क्लबसोबतच कॉलेज कँटीन, हॉस्टेल्स, कॉफी शॉप्स, लाऊंज, सोसायटीचे पार्क किंवा जिमसारख्या ठिकाणी, अगदी लहान हॉल बुक करून, युवकांचे ग्रुप्स आधुनिक वाद्यांच्या ठेक्यावर ईशनाम घेत, भक्तीत लीन होताना दिसत आहेत. हनुमान चालीसा, शिवतांडव आणि राधाकृष्णाच्या गीतांसह विविध श्लोक-मंत्र गात नाचणाऱ्या युवकांचे व्हिडीओज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. 'भजन आणि भोजन करताना संकोच करायचा नाही' या संकल्पनेवर धुंद होऊन भजन करणारी जेन झी, जीवन आणि अध्यात्माची सांगड घालून खरा आनंद घेते आहे. उपासनेचे हे माध्यम नवीन असले, तरी ईशभक्तीकडे नेणारेच आहे. यात नव्या पिढीसोबतच 'मिलेनियल्स' म्हणून ओळखली जाणारी मागच्या शतकातील पिढीही त्याच उत्साहाने सहभागी होते आहे. या नव्या माध्यमातून युवा पिढी अध्यात्माशी आपले नाते टिकवून आहे. माध्यम बदलले; मात्र त्यामागची भावना, श्रद्धा आणि भक्ती सकारात्मकता प्रदान करणारीच ठरावी.

९८५०३३९२४०

## विशेष

मोरेश्वर बडगे

# मुंबईचा महापौर कुणी खान झाला तर?

सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वारे वाहात आहेत. नगर परिषद निवडणुकांसाठी अर्ज भरण्याची धावपळ सुरू आहे. मतदार याद्या सदोष असल्याने निवडणुका पुढे ढकला म्हणणारेही मैदानात उतरत आहेत. पुढच्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि सर्वात शेवटी महापालिका निवडणुका आहेत. विचित्र समीकरणे यावेळी दिसू शकतात. शरद पवार आणि अजित पवार हे पवार कुटुंब एकत्र दिसू शकते. काहीही होऊ शकते. निवडणुकीच्या या हवेत दिल्लीत लाल किल्ल्याजवळ मोठा बॉम्बस्फोट झाला. १३ लोक मेले आणि जवळपास तेवढेच जखमी झाले. स्फोट दिल्लीचा आहे, पण त्याने महाराष्ट्रातील मतदारांना सावध केले आहे. तुम्ही कोणाला सत्तेत बसवणार याचे भान राखा, याची आठवण करून दिली आहे. अशीच आठवण चार महिन्यांपूर्वी मुंबई भाजपाचे अध्यक्ष अमित साटम यांनी भाजपाच्या एका मेळाव्यात करून दिली होती. 'मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत परत एकदा उद्धव ठाकरे बहुमत आणू शकले तर कुणी खान महापौर होऊ शकतो' असे अमित साटम म्हणाले होते. त्यावरून बरेच वादळ उठले होते. साटम किती नेमके बोलले होते, त्याची प्रचीती दिल्लीच्या बॉम्बस्फोटाने आली आहे. चुकीच्या व्यक्तीच्या हाती मुंबईची सूत्रे दिली तर जिहादींना मोकळे रान मिळू शकते. हे अनेकदा दिसून आले आहे.

कधीकाळी भिवंडीचे नगराध्यक्ष आपल्या गाडीतून दोन मारेकरी घेऊन जे. जे. हॉस्पिटलमध्ये आले होते, हे विसरता येणार नाही. शरद पवार संरक्षण मंत्री होते तेव्हाची गोष्ट आहे. संरक्षण खात्याच्या विमानातून पवारांनी दाऊदच्या शार्प शूटर्सना उत्तर प्रदेशातून मुंबईला आणले होते. चुकीच्या व्यक्तीच्या हाती शहराची सूत्रे गेली तर गुन्हेगारीला मोकळे रान मिळायला वेळ लागत नाही. प्रत्येक मुसलमान अतिरेकी असतोच असे नाही. बहुसंख्य मुसलमान सुखासमाधानाने या देशात जगत आहेत. पण अतिरेकी म्हणून पकडले जातात ते मुसलमानच असतात, हेही कटू वास्तव आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या उबाठाला मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत बहुमत मिळाले तर त्याचे गांभीर्य लक्षात घ्या. महापौराला विशेष अधिकार नसतात. पण शहराचा पहिला नागरिक म्हणून त्याला आदराने वागवले जाते. त्याच्याकडे पाहण्याचा पोलिसांचा दृष्टिकोन बदलतो, हे नाकारता येणार नाही. त्यामुळे महापौरांच्या गाडीला कुठेही सहज जाऊ दिले जाते. १९९२-९३ दंगलीत शिवसेनेने मुंबई वाचवली. तेव्हा शिवसेना अखंड होती.



आज दहशतवाद्यांनी मुंबईत दंगल पेटवली तर उद्धव ठाकरे कोणाच्या बाजूने उभे राहतील? गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंची भूमिका आठवा. कोणत्या व्होट बँकेसाठी उद्धव धडपडत होते? महापौरांसाठीच्या सुविधा दहशतवाद्यांच्या बुरख्यात उभ्या महापौराला उपलब्ध झाल्या तर काय परिस्थिती उद्‌भवेल, याची कल्पनाच करवत नाही. १० वर्षांपूर्वी आपल्याकडे सारखे बॉम्बस्फोट व्हायचे. तेव्हा मनमोहन सिंग पंतप्रधान होते, काँग्रेसचे सरकार असायचे. पण पाकिस्तानला धडा शिकवण्याची भाषा सिंग करू शकत नव्हते. २०१४ मध्ये देशाची सत्ता नरेंद्र मोदी यांच्या हाती आली तेव्हापासून चित्र पालटले. गेल्या निवडणुकीत भाजपाची बहुमताची उडी थोडी कमी पडली. दोन मित्रपक्षांना घेऊन मोदींचे सरकार सध्या उभे आहे. एकेकाळचे पाशवी बहुमत घटल्यानंतर आता काय काय घडतंय ते तुमच्या लक्षात आलं असेल. तब्बल १२ वर्षांनंतर दिल्लीत घुसून बॉम्बस्फोट करण्याचे धाडस दहशतवादी दाखवत आहेत. पाकिस्तानमधून निघून पहलगामपर्यंत अतिरेकी पोहोचले. धर्म विचारून त्यांनी एकेकाला गोळ्या घातल्या. आता लाल किल्ल्यावर कारने येऊन बॉम्बस्फोट घडवले. मोदी सरकार कधीही पडू शकते, असा प्रचार विरोधकांनी चालवला आहे. त्यामुळे घातपात्यांची हिंमत वाढली आहे. फरिदाबादमध्ये २९०० किलो स्फोटके जप्त होतात, याचा अर्थ लक्षात घ्या. कलकत्त्याचा महापौर तृणमूल काँग्रेसचा कुणी हकीम आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी त्याला रोखू शकत नाहीत. त्याला पकडण्याची पोलिसांची हिंमत नाही. उद्धव ठाकरे त्याच वळणावर आहेत. या साऱ्या पृष्ठभूमीवर आगामी महापालिका निवडणुकीकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे. ठाकरे ब्रँड, मराठी अस्मिता या प्रचारात वाहून जाऊ नका. हा केवळ मुंबईचा विषय नाही. प्रत्येक मोठ्या शहरापुढे हे संकट आहे. अतिरेक्यांना गोंजारणारा महापौर पाहिजे की ठेचणारा महापौर पाहिजे, हे लोकांना या निवडणुकीत ठरवायचे आहे. निवडणुका जिंकण्यासाठी देशाला संकटात टाकू नका. निवडणुका जिंकून देश हरला तर तो धोका ओळखा. म्हणून हिंदू म्हणून प्रत्येकाला जगावे लागेल, सावध राहावे लागेल. तीन हजार किलो विस्फोटक कशाला म्हणतात? त्यांचा स्फोट घडवला असता तर प्रलय झाला असता. तो डाव उधळून लावला यासाठी आपल्या गुप्तचर पोलिसांचे कौतुक करायला पाहिजे.

एक लक्षात घ्या. ही लढाई केवळ आतंकवादाविरुद्ध नाही. 'पॉलिटिकल इस्लाम'ची लढाई आहे. भारताला इस्लामी देश बनवणे हे दहशतवाद्यांचे टार्गेट आहे. 'सब का साथ, सब का विकास' ही घोषणा ऐकायला कर्णप्रिय आहे. काश्मीर खोऱ्यातील लोक ती समजून घेण्याच्या मानसिकतेत आहेत का? एकेकाळी आपल्या पोलिसांना दगड फेकून मारणारी कोवळी मुलं आज कुठे आहेत? ती दहशतवादी बनली आहेत, संधीची वाट पाहत आहेत. त्यांना ठेचले पाहिजे. 'ऑपरेशन सिंदूर' होऊन सहा महिने झाले. आपल्या सैन्याने सर्जिकल स्ट्राईक केला, एअर स्ट्राईक केला, 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. त्याने तात्पुरता फायदा मिळाला. स्थायी उत्तर शोधले पाहिजे. खोड्या केल्या तर आपली खैर नाही अशी भीती पाकिस्तानला वाटली पाहिजे. भारतात घुसू पाहणाऱ्या एखाद-दुसऱ्या दहशतवाद्याला आपले सैनिक टिपून मारतात. पण त्याने पाकिस्तानला फरक पडत नाही. त्यांच्याकडे मरायला खूप धर्मवेडे आहेत. विदेशातून शस्त्रं फुकट मिळतात. पैसेही मिळतात. त्यामुळे जोपर्यंत पाकिस्तानला भीती वाटत नाही तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही. आपल्या घरातल्या सापांचाही इलाज करावा लागेल. घुसखोरांना देशातूनच ताकद मिळते. आता तर त्यांनी रूपही बदलले आहे. अतिरेक्यांच्या स्वरूपात डॉक्टरांना उभे केले जात आहे. दहशतवादाचा हा 'व्हाईट कॉलर' चेहरा प्रथमच पुढे आला आहे. अतिरेक्यांना कोर्टात लढायला वकील कसे मिळतात? या 'वकिलांचा' सरकारला काही वेगळा बंदोबस्त करावा लागेल. कठोर हाताने आपण नक्षलवाद मोडून काढला. तसा हा दहशतवादही मोडायचा असेल तर आपल्या सरकारला कठोर कारवाई हाच एक इलाज आहे. आठ-दहा हल्ले करून पाकिस्तान वठणीवर येणार नाही. त्याचे कंबरडे मोडायचे असेल तर पाकिस्तानवर मोठा हल्ला हेच उत्तर आहे. मुंबईत हल्ला झाला तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानमध्ये होते. 'दोषींना सोडणार नाही' असे मोदींनी तिथून ठणकावले. मोदींनी म्हटले म्हणजे पाकिस्तानवर हल्ला होणार हे नक्की. 'ऑपरेशन सिंदूर-२' केव्हाही घडू शकते. हे युद्धच असेल. मोदी शत्रूला चुका करण्याची संधी देतात. पण त्याच त्याच चुका सारख्या झाल्या तर मोदी तिसरा डोळा उघडतात. देशाला या तिसऱ्या डोळ्याची प्रतीक्षा आहे.

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-४२

शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५

### एकता आज्ञांकिता हा मंत्र अमुचे अंतरी

एकता आज्ञांकिता हा मंत्र अमुचे अंतरी
श्वासनिश्वासातुनी निष्ठा असे नेत्यावरी ॥धृ.॥

अम्हीच स्वेच्छेने केले अधीन जीवन राष्ट्राच्या
दिली खंडणी कर्तृत्वाची एकमुखाने संघाच्या
या प्राणावर निज नेत्याची केवळ इच्छा अधिकारी ॥१॥

युक्तिबुद्धिने सहजपणे दूर करावी जनभ्रांती
संघटनेची स्थिती पहाया रोज जमावे एकांती
महत्कार्य यातून घडावे वाजु लागता रणभेरी ॥२॥

स्नेह जमवुनी ईर्ष्येने, अणूअणूतुनि राष्ट्राच्या
अखंड लावू दीपमालिका ज्वलंत अंत:करणांच्या
संकेताची वाट पाहतिल अनंत ज्योती घरोघरी ॥३॥

स्फुल्लिंगातुन वायूने अलोट उठती दावाग्नी
जलबिंदूंच्या प्रचंड धारा सृष्टि बुडविती लाटांनी
शक्तिसंचयातून पूर्तता सामर्थ्याची भयकारी ॥४॥

उपासना सामर्थ्याची चिरंतनपणे चालावी
इतिहासाच्या पानोपानी रोमहर्षता नटवावी
निधडी छाती दृश्य रंगविल भवितव्याचे सुखकारी ॥५॥

ध्येयपूर्तता करताना, चमकुनि विद्युत्वेगाने
अदृष्टाच्या पायतळी वा चुरडुनि जाता दैवाने
नसे तमा आम्हांस ऐकता हिंदुत्वाची ललकारी ॥६॥

### दहशतवादाचे मूळ स्थान पाकिस्तान

सोमवारी सायंकाळी लाल किल्ल्यासमोर हरयाणा पासिंगच्या आय-२० कारमध्ये झालेला तीव्र क्षमतेचा स्फोट हा दहशतवादी हल्लाच होता, यावर केंद्रीय तपास यंत्रणा आणि दिल्ली पोलिसांनी शिक्कामोर्तब केले आहे. केंद्रीय यंत्रणांच्या माहितीनुसार, गुजरात एटीएस, जम्मू-काश्मीर पोलिस, फरिदाबाद पोलिस आणि दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या पाकिस्तानी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांच्या चौकशीतून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या दहशतवाद्यांचे मोबाईल कॉल डिटेल्स आणि सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीतून तपास यंत्रणा मोठ्या प्रमाणावर अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचल्या आहेत. जैश मॉड्यूलचा पर्दाफाश करताना आतापर्यंत पाच डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी ही व्हाईट कोट टेरर इको-सिस्टिम शोधून काढली. यातील सर्व जण शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आहेत. तपास जस जसा पुढे सरकत आहे तस तसे पुन्हा एकदा दहशतवादाचे मूळस्थान असलेल्या पाकिस्तानवरील संशय गडद होत आहे. वारंवार आक्रमणे करणाऱ्या दहशतवाद्यांचा प्राण असलेले पाकिस्तान नष्ट करण्याचेच ध्येय आता सरकारने ठेवले पाहिजे!

**अपर्णा जगताप** /नागपूर

## वाचक पत्रे

### आजचे बदलते करीअर विश्व....

आजचा काळ हा वेगवान बदलांचा काळ आहे. आता करीअर म्हणजे फक्त एक नोकरी नव्हे, तर सतत शिकत राहण्याची आणि स्वतःला अपडेट करत राहण्याची प्रक्रिया बनली आहे. अलिकडेपर्यंत डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक, वकील हीच मोठी करीअर पर्याय मानली जात. पण आता डेटा सायंटिस्ट, डिझायनर, यूट्यूबर, एआय इंजिनीअर डिजिटल मार्केटर, सायबर सुरक्षा विश्लेषक हे सगळे जग खऱ्या अर्थाने करीअर बनले आहे. कोडिंग, डाटा, एआय/एमएल , क्लाऊड, सायबर सिक्युरिटी यांसारख्या कौशल्यांना मोठी मागणी आहे. एकच करीअर आयुष्यभर पुरत नाही. लोक चार-पाच वर्षांनी क्षेत्र बदलतात किंवा कौशल्ये बदलतात. कौशल्य जिज्ञासा अपडेट राहणे यावर उभं आहे. कोणते क्षेत्र निवडले, यापेक्षा आपण ते क्षेत्र बदलाना कसे जुळवतो हे जास्त महत्त्वाचे. म्हणूनच आजच्या पिढीने आपल्या करीअरविषयी पारंपरिक चौकट सोडून लवचीकता आणि सतत शिकणे हे तीन शब्द मनात ठेवणे गरजेचे आहे. या बदलत्या करीअर विश्वात विविधता आणि लवचीकता ही वाढती महत्त्वाची घटक बनली आहेत. त्यामुळे उद्योगांना अधिक ताणतणावमुक्त, सर्जनशील आणि टिकाऊ बनण्यास मदत होते. बदलत्या करीअर विश्वात आपले स्थान निर्माण करायचे असल्यास, आपली तयारी, जिद्द आणि नवकल्पना आवश्यक आहे. या बदलांमध्येच नव्या आशा आणि संधी दडलेल्या आहेत. त्यामुळे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९१११७१६९

### वाढती सायबर फसवणूक

देशात वाढती सायबर फसवणूक पोलिसांपुढे आव्हान बनत चालली आहे. पोलिस यंत्रणा वाढत्या सायबर फसवणुकीपुढे तोकडी पडत असल्याचे दिसत आहे. वर्ष २०२४ मध्ये देशात सायबर गुन्हेगारी घटनामध्ये गतवर्षीच्या तुलनेत मोठी वाढ झाली तर या २०२५ वर्षात आतापर्यंत ती दुपटीने वाढली आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे भारतातील नागरिक, व्यावसायिक संस्था, बँका आणि सरकारी यंत्रणा हादरून गेल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, पेन्शनधारक सायबर गुन्हेगारीचे बळीचे बकरे ठरत आहेत. केंद्र व राज्य सरकारने यावर आळा घालण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा अंमलात आणावी व पोलिस यंत्रणा अधिक सक्षम व सतर्क करावी व देशातील नागरिकांची होत असलेली फसवणूक थांबवावी.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बस स्थानकावर गर्दीचा गैरफायदा घेऊन दागीने चोरी करणाऱ्या आरोपींचा संभाजीनगर, परळी पोलीसांकडून पर्दाफाश, मुद्देमालासह आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१४ नोव्हेंबर**

फिर्यादी नामे प्रतिक विलास वाघमारे रा. अंकुश नगर तालुका जिल्हा बीड यांनी पोलीस स्टेशन संभाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याची आई सुनिता विलास वाघमारे दिनांक-०४/११/२०२५ रोजी नांदेडहून बीड येथे जात असताना परळी बस स्टॅन्ड येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अनोळखी आरोपीने तिचे गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे १,४५,०००/ रुपयाचे मिनी गंठण चोरून नेले आहे, वगैरे फिर्यादीवरून पो.स्टे. संभाजीनगर गुरनं २३०/२०२५ कलम ३०३ (२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरीष्ठांनी तपास अधिकारी यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या. त्यावरून तपासीक अंमलदार पोह/४१६ साजीद पठाण यांनी गुन्हयाचे तपासात बस स्थानक परळी येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पाहून आरोपी निष्पन्न केले. आरोपी ऑटो मधून गेल्याचे दिसून आले. सदर मार्गावरील परळी शहरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करून त्यांचा मार्ग शोधला असता शहराच्या बाहेर दोन किलोमीटर गेले व तेथे थांबून असलेल्या चार चाकी स्विफ्ट डिजायर गाडी मधून निघून गेले. गाडीचा नंबर व तांत्रिक पुराव्याच्या आधारे शोध घेतला असता सदरचा गुन्हा १. नरसिंग कोंडीबा बंन वय ३८ वर्ष रा. गांधीनगर, उदगीर ता.उदगीर जि. लातूर व त्याच्या दोन महिला साथीदारासह केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यात आरोपी नामे नरसिंग कोंडीबा बंन वय ३८ वर्ष रा. गांधीनगर, उदगीर ता. उदगीर जि. लातूर यास अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेले १,४५,०००/- किंमतीचे सोन्याचे १३ ग्रॅम वजनाचे मिनीगंठण व आरोपीने गुन्हा करताना वापरलेली स्विफ्ट डिझायर चार चाकी गाडी क्रमांक MH-04-JB-1560 किंमत अंदाजे ५,००,०००/- असा एकूण सदर गुन्ह्यात ६,४५,०००/-रुपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.




सदर कार्यवाही नवनीत कॉवत, पोलीस अधिक्षक सो बीड, श्रीमती चेतना तिडके मॅडम, अपर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई, वेंकटराम, सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज, अति पदभार अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली धनंजय ढोणे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे संभाजीनगर, पोलीस उपनिरीक्षक, अनिल शिंदे, पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप चव्हान, पोह/४१६ साजीद पठाण, पोशि/१७२१ शंकर डोंगळे, पोशि/२०९८ व्यंकट डोरणाळे, पोशि/७१० भगवान चव्हान, सर्व नेमणुक पोलीस ठाणे संभाजी नगर परळी वै. यांचे पथकाने केलेली आहे.

# निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे-जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम- २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला असून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात आलेली आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदाच्या निवडणूका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि.४ नोव्हेंबर ला निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलेले आहे.

त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांची बैठक दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत आदर्श आचार संहितेचे पालन करणे व प्रभावीपणे अंमलबजावणी करणे बाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे बाबत आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.



बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिदांच्या सार्वत्रिक निवडणुका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी खालील मुद्यांच्या अनुषंगाने आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

शासकीय/निमशासकीय कार्यालये/विश्रामगृहे इ. परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा देणे व सभा घेणे इ. बाबींबाबत निर्बंध, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही करणे.उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपद्धती. नमुना मतपत्रिका छपाईवर निबंध घालणेबाबत. धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध,धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निबंध घालणे. मोटारगाड्या वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध घालण्याबाबत.

प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचारांचे कापडी फलक, झेंडे लावणे इ. बाबींसाठी निबंध घालणे, ध्वनीक्षेपकाचे वापराबाबत निबंध सार्वजनिक इमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निबंध घालण्याबाबत. खाजगी व्यक्तींच्या जागेवर/सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध घालणे, उपरोक्त प्रमाणे आदेशांचे पालन सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व नागरिकांनी करावेअसे आवाहन जिल्हाधिकारी विविक जॉन्सन यांनी केले आहे.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**तेलगाव दि.१३ नोव्हेंबर**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ चा प्रतिष्ठेचा व मानाचा पुरस्कार जाहीर झाला.याबद्दल कारखाना चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालकांसह कारखाना प्रशासनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वर्ल्ड व कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्था,व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.त्याप्रमाणे या वर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ योगदानाबद्यल दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ हा पुरस्कार तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर कारखान्यास नुकताच घोषीत झाला.तसे पत्र ग्रीन वर्ल्ड पब्लीकेशनच्या वतीने सोळंके कारखान्यास कळविले असल्याची माहिती चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. ते म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, साखर उत्पादनातील गुणवत्ता, उत्पादन खर्चातील सुव्यवस्था आणि कारखाना व्यवस्थापनातील पारदर्शकता यांचा उत्तम संगम साधला आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या व्यापक विकासासाठी इथेनॉल उत्पादन, को. जनरेशन प्रकल्प (बिज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर उत्पादन, डिस्टिलरी, कचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प यातील काही जोड व्यवसायांचे यशस्वीपणे संचालन करुन शाश्वत विकासाचे मॉडेल निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांव्दारे शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मातीस मोठा हातभार लागलेला आहे. सहकार मुल्यांवर आधारीत या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करुन वरील संस्थांनी कारखान्याची ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी सहकार सभागृह कॉसमॉस को.ऑप. बँक लि, शिवाजीनगर पुणे येथे सन्माननीय केंद्रीय मंत्री व राज्यातील विविध खात्याचे मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सदरचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कारखान्यास मिळालेबद्यल सर्व सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी, हितचिंतक यांचे वतीने कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके, मा.श्री. धैर्यशीलकाका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके, व्हा. चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

# धारूर नगरपरिषद निवडणूक तयारीचा आढावा; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडून नियोजनबद्ध प्रक्रियेवर समाधान

## केवळ तीन अर्ज दाखल; १७ नोव्हेंबर अंतिम मुदतीपूर्वी सोमवारी (दि. १७) मोठ्या गर्दीची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१३ नोव्हेंबर**

किल्ले धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या नामनिर्देशन पत्र (अर्ज) भरण्याच्या प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन (भाप्रसे) यांनी आज, दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता नगरपरिषद कार्यालयाला अचानक भेट दिली. नगराध्यक्ष आणि नगरसेवकपदाच्या निवडणुकीसाठी सुरू असलेल्या अर्ज भरणा केंद्रावर करण्यात आलेल्या नियोजनबद्ध प्रक्रियेवर जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

नियोजन प्रक्रियेची पाहणी निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया नगरपरिषद कार्यालयात सुरू आहे. या ठिकाणी अर्ज भरण्यासाठी करण्यात आलेले संपूर्ण नियोजन श्री. विवेक जॉन्सन यांनी स्वतः प्रत्यक्ष पाहणी करून तपासून पाहिले. यावेळी त्यांनी निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधून, अर्जदारांसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेतील अडीअडचणी आणि संभाव्य सुधारणांबद्दल विचारणा केली.या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान निवडणूक अधिकारी, तहसीलदार निळे साहेब, गटविकास अधिकारी लोखंडे साहेब, नगरपरिषद सीईओ (मुख्य कार्यकारी अधिकारी) आणि इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.अर्ज दाखल करण्याची स्थिती अर्ज दाखल करण्याच्या नियोजनावर जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असले तरी, आजच्या (दि. १४ नोव्हेंबर) घडीला नगरपरिषद येथून केवळ तीन अर्ज प्रक्रिया पूर्ण करून दाखल झाले असल्याची माहिती मिळाली आहे. मुदतीपूर्वी गर्दीची शक्यता अर्ज भरण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर असल्याने, अंतिम दिवसापूर्वी येणाऱ्या सोमवारी उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, निवडणूक अधिकाऱ्यांनी गर्दीचे नियोजन करण्यासाठी अधिक दक्ष राहावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याचे समजते.

# संत भगवानबाब ऊसतोड कामगारांच्या मुलींचे शासकीय वसतीगृह गेवराई करीता इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ पुणे अंतर्गत चालविण्यात येणा-या संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुलीचे शासकीय वसतीगृह, गेवराई तालुक्याच्या हद्दीमध्ये १०० विद्यार्थीनींकरीता निवासाची सोय असलेली सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी १०००० स्केअर फुट इमारत, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृहे, शौचालय, संरक्षण भिंत उपलब्ध असणारी इमारत भाडेतत्वावर घ्यावयाची असून अशी इमारत उपलब्ध असल्यास इमारत भाडेतत्वावर देण्याकरीता संबंधित इच्छुक इमारत मालक यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड अथवा मागासवर्गीय मुलीचे शासकीय वसतीगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड या कार्यालयांशी दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा, असे संत भागवानबाबा उसतोड कामगार, मुलींचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षते खाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती संभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न.

या बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एफ. एम. शेख व परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव आणि चाइल्ड समन्वयक अश्विनी जगताप यांनी माहे एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ काळात थांबवलेले १५१ बालविवाहची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

# बीड येथे १४ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान मधुमेह रुग्णांची लघवी व रक्त तपासणीची मोफत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**

आनंद ऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे गेल्या कित्येक वर्षांपासून 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर रुग्णसेवा करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १४ नोव्हें बर - जागतिक मधुमेह दिन व्यापकपणे साजरा करण्यात येतो. जगभरामध्ये शंभर कोटींहून अधिक लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत. ही गंभीर सामाजिक जाणीव लक्षात घेऊन आनंद ऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे मोफत मधुमेह तपासणी उपक्रम राबविण्यात आला आहे.




३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मधुमेह रुग्णांसाठी व ज्यांना मधुमेहाची लक्षणे जाणवत आहेत अशांसाठी खालील तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत:

- रक्तातील जेवणाअगोदरची साखर (Fasting Sugar)
- जेवणानंतरची साखर (PP Sugar)
- रँडम शुगर तपासणी

अलीकडच्या काळात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने वेळेवर तपासणी व जीवनशैलीतील बदल केल्यास आजार नियंत्रणात राहू शकतो. अनेक रुग्णांकडून या गोष्टींकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे सामाजिक भान म्हणून हा उपक्रम बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी विशेष राबविण्यात येत आहे.तपासणीसोबत मोफत वैद्यकीय मार्गदर्शन देखील करण्यात येणार असून बीडमधील सुप्रसिद्ध डॉ. राजेश पारिख मार्गदर्शन करणार आहेत.

तपासणीची वेळ : दररोज सकाळी ७ ते संध्याकाळी ७

हा उपक्रम आनंद ऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला सुरू आहे.या स्तुत्य उपक्रमाचा लाभ बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी जास्तीत जास्त घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड व जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पारितोषीक वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**

बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा १, चला उधळूया लोकरंग गायन -वादन, नृत्य असे उपक्रम बीड शाखेतर्फे १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरामध्ये होणार आहे. या महोत्सवाचे पारितोषीक वितरण प्रसिध्द अभिनेत्री तथा बालरंगभूमी परीषदेच्या अध्यक्षा निलम शिर्के सामंत यांच्या हस्ते होणार आहे. बीड जिल्हयातील गेवराई येथील चिंतेश्वर विद्यालय, जिल्हा परीषद माध्यमीक शाळा गेवराई, जिल्हा परीषद प्रा. शाळा जिरेवाडी, द केम्ब्रीज स्कुल गेवराई, आर्ट ऑफ फन, अंबेजोगाई येथील खोलश्वर विद्यालय, बीड येथील संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, शिवाजी विद्यालय, यशवंत विद्यालय, सावरकर विद्यालय, सैनिकी विद्यालय, धुतेकर संगीत विद्यालय, पोदार इंग्लिश स्कुल, स्वराधीश संगीत अकॅडमी, एन.एस.सी. संगीत अकॅडमी त्याचबरोबर, विनायक प्रशाला, संभाजी प्रा.शाळा आदी शाळेच्या बालकलावंतानी समुह लोकनृत्य, समुह लोकगायन, वैयक्तिक लोकगायन आणि लोकवाद्य वादन या कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवलेला आहे.

# बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'जन शिक्षण संस्थान बीड' तर्फे 'संस्कृती विद्यालय' येथे प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न!



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ नोव्हेंबर**


थोर क्रांतिकारक आणि जननायक बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या जन शिक्षण संस्थान (जेएसएस), बीड यांच्या वतीने १नोव्हेंबर ते ,१५ नोव्हेंबर पंधरवडा सुरू असून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून,संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार संस्कृती विद्यालय, म्हसोबा फाटा, बीड येथे एका विशेष कार्यक्रमाचे आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बिरसा मुंडा यांच्या अतुलनीय जीवनकार्याला आदरांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी जन शिक्षण संस्थान, बीडचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. सुदाम पालकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बिरसा मुंडा यांच्या शौर्यपूर्ण जीवन कार्याची आणि त्यांनी आदिवासी समाजासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. त्यांच्या भाषणाने विद्यार्थी व शिक्षकांना मोलाची प्रेरणा मिळाली.भव्य निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर आधारित निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ८ वी ते १० वी या वर्गातील तब्बल १४७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्या लेखणीतून या महान क्रांतीकारकाविषयीचे विचार मांडले.

# राजकिशोर मोदी यांनी प्रभाग १ व प्रभाग २ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेत प्रचाराचा केला श्रीगणेशा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ नोव्हेंबर**

अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून त्यामध्ये दिवसेंदिवस निवडणूकित रंग भरत असल्याचे दिसून येऊ लागले आहे. याच अंबाजोगाई नगर परिषदेच्या रणधुमाळीत नगराध्यक्ष पदाचे प्रमुख उमेदवार राजकिशोर मोदी यांनी त्या त्या प्रभागातील आपल्या सहकारी उमेदवारांना घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. गुरुवार दि १३ रोजी प्रभाग क्रमांक १ मधून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत प्रचाराचा शुभारंभ केला. शुक्रवार दि १४ रोजी प्रभाग क्रमांक २ मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याची व मतदान रुपी आशिर्वाद देण्याची साद राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी दिली. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १ मधील प्रमुख उमेदवार संकेत राजकिशोर मोदी व हाजी शेख व त्या प्रभागातील अनेक सहकारी उपस्थित होते. तर प्रभाग क्रमांक २ मध्ये तेथील प्रमुख उमेदवार अंकुश हेडे व मणियार व त्या प्रभागातील प्रमुख सहकारी हे सहभागी होते.



प्रभागातील या भेटीदरम्यान राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतदारांच्या कडून उत्स्फूर्तपणे स्वागत केल्या जात होते. त्याचबरोबर जागोजागी सुवासिनींकडून औक्षण देखील केल्या जात होते. यावरून राजकिशोर मोदी यांच्या प्रति मतदारांचा विश्वास व प्रेम दिसून येत होते. अंबाजोगाई शहर हे मोदी कुटुंबाला मानणारे शहर आहे. त्याच्याच सहकार्य व आशीर्वादाने राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहर वासीयांची सेवा करत आहेत. आपल्या पित्याच्या समाजसेवेचा राजकीय वसा पुढे चालवण्यासाठी त्यांचे सुपुत्र संकेत मोदी हे त्यांच्या आयुष्यातील पहिलीच निवडणूक लढवीत आहेत. संकेत मोदी हे शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत आपला सक्रिय सहभाग घेऊन त्यातून त्यांनी युवकांची एक नवीन फळी तयार केली आहे. संकेत मोदी यांनी गणेशोत्सव काळात अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाच्या ढोलताशा वाद्य स्पर्धा घेऊन अंबाजोगाई चे ढोल पथक साऱ्या महाराष्ट्र भर पोचवले आहे. त्याचबरोबर नवरात्र उत्सवात दांडिया स्पर्धेची उत्कृष्ट अशी स्पर्धा आयोजित करून येथील महिला, युवक व युवतींना एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून संकेत मोदी हे अंबाजोगाई शहरातील घराघरात पोचले आहेत.अंबाजोगाई नगर परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी हे त्यांनी आजपर्यंत केलेल्या विकासकामांच्या बळावरच यापुढेही मतदान रुपी आशिर्वाद मागत आहेत. अंबाजोगाई शहर हे एक कुटुंब म्हणून आपण काम केले असून येथील नागरिकांनी देखील भक्कम अशी साथ दिली आहे. यापुढेही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना पाठबळ देण्याचे आवाहन या प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी मतदारांना करत आहेत. मतदार देखील खंबीरपणे मोदी कुटुंबाच्या पाठीशी राहण्याचे अभिवचन देतांना दिसून येत आहेत. शहरातील मतदार नवयुवक, महिला व जेष्ठ नागरिक यांच्या कडून मिळत असलेले प्रेम पाहून मोदी व त्यांचे सहकारी भारावून जात आहेत व त्यांच्यात पुन्हा जोमाने काम करण्याची ऊर्जा संचारत असल्याची भावना निर्माण होत आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपा व एनडीएचा ऐतिहासिक विजय झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने जल्लोष करण्यात आला व मिठाई वाटप करण्यात आली.

# अतिशय महत्त्वपूर्ण विजय: खा. अशोक चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ नोव्हेंबर-**

बिहार विधानसभा निवडणुकीतील भाजप व एनडीएचा विजय हा अतिशय महत्त्वपूर्ण विजय आहे. एनडीएला मोठे बहुमत मिळाले असल्याची प्रतिक्रिया खा. अशोक चव्हाण यांनी दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे सूक्ष्म नियोजन, बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार यांची उत्तम प्रतिमा आणि भाजप-जेडीयू सरकारच्या माध्यमातून बिहारमध्ये झालेला विकास याचा परिपाक म्हणजे हा विजय आहे. या विजयासाठी मी या तीनही नेत्यांचे आणि बिहारमधील सर्व कार्यकर्त्यांचे व मतदारांचे अभिनंदन करतो. भाजपवर बिनबुडाचे आरोप करायचे, मतचोरीचा ठपका ठेवायचा, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करून मते मिळवण्याचा प्रयत्न करायचा, हा प्रकार जनतेने नाकारला आहे. बिहारचा निवडणूक निकाल हा लोकशाहीचा विजय आहे. नांदेड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सुद्धा भाजप युतीचा विजय निश्चित आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास आणि विश्वासावरील विजय : खा. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ नोव्हेंबर-**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालात भारतीय जनता पार्टी आणि एनडीए ला मिळालेला विजय हा देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास आणि विश्वासाचा विजय आहे. आगामी काळातही देशातील कानाकोपऱ्यातील निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षाचा विजय होईल असा विश्वास खा.डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला असून बिहारमधील ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खा. गोपछडे यांनी जाहीर अभिनंदन केले आहे.



बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते . या निवडणुकीत बिहार मधील मतदारांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षावर प्रचंड विश्वास दाखवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेला विकास तसेच आतंकवाद दहशतवाद आणि भ्रष्टाचाराचे केलेले उच्चाटन , रोजगाराच्या असंख्य नवीन संधी , विकासाचा समतोल आणि प्रत्येक भारतीयांमध्ये निर्माण केलेला आत्मविश्वास यामुळे बिहार निवडणुकीतही तेथील मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

त्यामुळे बिहारमध्ये पुन्हा एकदा भाजपा एनडीएचे सरकार स्थापन होणार आहे. हा ऐतिहासिक विजय मिळवून देणारे देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार , महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खा. डॉ. गोपछडे यांनी जाहीरपणे अभिनंदन केले आहे. देशातील जनतेला भ्रष्टाचार, घराणेशाही नाही तर पारदर्शक लोकशाही हवी आहे आणि ही लोकशाही केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वात टिकून राहील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शिवाय ते म्हणाले की , बिहार विधानसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रात होणारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षाची सत्ता स्थापन होईल. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## नगरपरिषद निवडणुकीचे नामनिर्देशपत्र १५ नोव्हेंबरला स्विकारली जाणार

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यातील १२ नगरपरिषदा व १ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र सादर करावयाच्या कालावधीतील शनिवार १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात यावेत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाले आहेत.याअनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले आहेत. या निवडणूक कार्यक्रमात रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाही असे नमूद आहे. त्यामुळे शनिवार १५ नोव्हेंबर २०२५ रोजी नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात यावेत का यासंदर्भात विचारणा होत असल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडून वरीलप्रमाणे हे निर्देश प्राप्त झाले आहेत.

## फर्स्ट स्टेप बालसंस्कार केंद्र तर्फे आज सामूहिक वंदेमातरम चे आयोजन

**नांदेड** -शैक्षणिक सांस्कृतिक आध्यात्मिक तथा सर्वांगिक विकासा सोबत राष्ट्रीयत्वाचे महत्त्व पटवून विद्यार्थ्या मध्ये रुजविण्याचे काम सातत्याने दीप नगर नांदेड येथील फर्स्ट स्टेप बालसंस्कार केंद्र करत आहे १५० वर्षा पूर्वी स्वातंत्र्याच्या काळात लोकांन मध्ये देशभक्तीची भावना जागृत करणारे ीं स्वातंत्र्याच्या संघर्षावर आधारित असे बक्किमचंद चटर्जी यांनी वंदेमातरम हे गीत लिहिले घटना समिती ने राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले या गीतास १५० वर्ष पूर्ण होत असून समाजात राष्ट्रियत्व जागरूक राहण्यासाठी फर्स्ट स्टेप बालसंस्कार केंद्र दीप नगर नांदेड तर्फे वंदेमातरम या गीताचे सामूहिक सादरीकरण करण्यात येणार आहे तसेच या कार्यक्रमालां शांभवी साले वक्ते म्हणून लाभणार आहेत तर अनुराधा पत्की प्रास्ताविक मांडणार आहेत या कार्यक्रमा साठी सर्व देशप्रेमी लोकांनी आज शनीवारी ५.० वाजता बजाज नगर हनुमान मंदिर नांदेड येथे उपस्थित रहावे असे आव्हान संचालिका सौ राधिका धानोरकर ीं मुकूंद धानोरकर यांनी केले आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशिष नेरळकर क्षितिज जाधव उमेश दिघे प्रताप पावडे राजेश कांबरा कपिल चिंतेवर प्रयत्न शील आहेत.

## नांदेड जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा सरचिटणीसपदी यशपाल भोसले

**नांदेड** -अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजीटल मीडिया परिषद नांदेड जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली अ असुन सरचिटणीसपदी यशपाल भोसले यांची निवड करण्यात आली आहे. परिषदेचे जिल्हाध्यक्ष मुजीब शेख यांनी ही कार्यकारणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशाने डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडली आहे. या कार्यकारणीत उत्तर कार्याध्यक्षपदी अनिल मादसवार यांची तर दक्षिण कार्याध्यक्षपदी प्रकाश महिपल्ले यांची निवड केली आहे. जिल्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी यशपाल भोसले यांच्याकडे तर जिल्हा सचिव म्हणून संघरत्न पवार यांची निवड करण्यात आली आहे. सहसचिव पदी मोहम्मद दानिश, जिल्हा संघटक म्हणून गौतम कांबळे, जिल्हा समन्वयक तानाजी शेळगावकर, सह समन्वयक म्हणून हैदर अली यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यकारणीत चार जिल्हा उपाध्यक्ष निवडण्यात आले आहेत. त्यामध्ये ईशान खान, राजरत्न गायकवाड, मिलिंद वाघमारे आणि अर्जुन राठोड यांना जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



## पत्रकार रामेश्वर बोरकर इंटरनॅशनल अचीवर पुरस्कार जाहीर

**निवघा बा** -हदगाव तालुक्यातील शिरड येथील छोट्याशा खेड्यातून आपली स्वतःची ओळख निर्माण करणारे तसेच अत्यंत गरीब परिस्थिती तून आज या यशाच्या शिखरावर जाण्याचा प्रवास करणारे हदगाव तालुक्यातील नीवघा परिसरातील सुप्रसिद्ध लोकमत वृतप्रत्र चे पत्रकार श्री रामेश्वर माधवराव बोरकर यांनी गेली अनेक वर्षे शैक्षणिक सामाजिक शेती विषयक सहकार क्षेत्रात करत असलेल्या कामाची दखल घेत बाळ शास्त्री जांभेकर प्रत्रकार असोशियन नाशिक तर्फे इंटरनॅशनल अचिवर अवार्ड साठी निवड करण्यात आली आहे व हा पुस्कार त्यांना ६ जानेवारी २०२६ रोजी शिर्डी येथे डॉ महेंद्र देशपांडे यांच्या हस्ते देण्यात येत आहे.

## मुदखेड येथे मतदान जनजागृती रॅली

**मुदखेड** -मुदखेड येथील नगरपरिषद सार्वत्रीक निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी होणार असून त्या अनुषंगाने स्वीप कक्षा अंतर्गत प्रभावी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशभूषेत शहरातील प्रत्येक वार्डामध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी उत्साहाने नारे देत मतदानाचे महत्त्व पटवून दिले आहे यामध्ये ''चला मतदानाला,, लोकशाही मजबूत बनुया,, तुमचा वोट, तुमचा हक्क मत देऊन बदल घडवा,, असे नारे देत नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजात जागरूक नागरिक बनण्याचा संदेश दिला आणि मतदान हा लोकशाहीचा उत्सव आहे,,हे मतदारांना पटवून दिले आहे. या जनजागृती कार्यक्रमास उपस्थित असलेले निवडणूक निर्णय अधिकारी आनंद देऊळगावकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी जगदीश दळवी,मारोतराव जगताप, स्वीप कक्ष प्रमुख प्रिया डहाळे, निवडणूक विभाग प्रमुख शैलेजा फुलारी आदींनी सहभाग नोंदविला होता.

# राष्ट्रवादी काँग्रेसने केले उमेदवार जाहीर



सौ.विजयमाला बालाजीराव टेकाळे, उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, न.पा.देगलूर | सौ.शकुंतला भगवानराव मुदिराज, उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, न.पा.उमरी | म.जावेद अब्दुल गणी, उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, न.पं.हिमायतनगर | श्रीमती वैशालीताई विनायकराव कुलकर्णी, उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, न.पा.धर्माबाद | श्रीमती गिरजाबाई माधवराव पाचलिंग, उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, न.पा.मुदखेड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकांसंदर्भाने अद्यापपर्यंत महायुतीचा युतीसंदर्भातला निर्णय झाला नसला तरी या निर्णयाची वाट न पाहता आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी नगर परिषद, नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट स्वबळावर निवडणूका लढविणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी आज त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेवून बारा नगरपालिका आणि एक नगरपंचायतीपैकी चार नगरपालिकेचे व एक नगरपंचायत असे एकूण पाच नगराध्यक्ष पदाचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे उमेदवार जाहीर केले. या पत्रकार परिषदेस माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहन हंबर्डे उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत देगलूर नगरपालिका विजयमाला बालाजीराव टेकाळे, उमरी नगरपालिका-शकुंतला भगवान मुदीराज, धर्माबाद नगरपालिका-वैशालीताई विनायकराव कुलकर्णी, मुदखेड नगरपालिका-गिरजाबाई माधवराव पाचलिंगे तर हिमायतनगर नगर पंचायत नगराध्यक्ष पदासाठी महंमद जावेद अब्दुल गणी यांचे नाव जाहीर करण्यात आले.

दरम्यान निवडणूका जाहीर होण्यापूर्वीच नांदेड जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका स्वबळावरच लढण्याचे जाहीर केले होते. त्यात खासदार अशोक चव्हाण, आमदार हेमंत पाटील यांनीही हिच भूमिका व्यक्त केली होती.

# हाणेगाव जिल्हा परिषद गण विकासापासून कोसो दुर

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. १४ नोव्हेंबर-**

देगलुर तालुक्यात सर्वात शेवटचा भाग म्हणजे हाणेगाव गण ,आंध्रा कर्णाटक महाराष्ट्र या तिन राज्याच्या सिमेलगत असलेला परीसर असुन तालुक्यात मोठा परीसर म्हणुन माणला जातो. याची मुख्य बाजारपेठ हाणेगाव असून जवळपास पंचवीस गावे वाडी तांडे या गणात येतात याच परीसरातील लोकांचे दैनंदीन कामानिमित्त रोजच वरदळ असते आज शैक्षणिक विचार केला तर ११वी १२ वी व पदविधर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी याच गावाला यावं लागतो येण्यासाठी दळणवळणाची सोय नाही ,बसस्टॉप नाही,विद्यार्थ्यांना थांबण्यासाठी सोय नाही,व्यापारीक विचार केला तर येथे रस्ते व्यवस्थीत नाहीत अवघड माल वाहतुक करण्यासाठी खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी अवस्था परीसरातील आहे. वैद्यकीय क्षेत्रातील विचार केल्यास एक प्राथमीक आरोग्य केंद्र असुन येथे रुग्नांना भौतीक सुविधां व्यवस्थीत मिळत नाहीत,बेरोजगारांचा विचार केल्यास परीसरात बरोजगारांना काम मिळण्यासाठी एखादा मोठा कारखाना नाही ,शेतकऱ्यांचा विचार केल्यास शेतकऱ्यांच्या मालाला शासनाचा हमी भाव मिळण्यासाठी एखादा शासन खरेदी काटा नाही,शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचन व्यवस्था नाही. प्राथमीक शिक्षणाचा विचार केल्यास जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.गावो वाडी तांडे जोडरस्ते आजही गोटा मुरमाचेच आहेत ,रोड नाली पाण्याचे गंभीर प्रश्न आहेत असे आनेक प्रश्न हाणेगाव जिल्हा परिषद गणात आहेत.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीचे बिगुल वाजल्यामुळे वेगवेगळ्या पक्षाचे भावी उमेदवार गावोगावी भेटुन विकासाचे आश्वासन देत आहेत, हाणेगाव जिल्हा परिषद गण सर्वसाधारण पुरुष सुटल्याने उमेदवार इच्छुकांची संख्या वाढली आहे याच गणातुन आनेक मातब्बर नेत्यांनी निवडुन येऊन आपला राजकीय नशीब आजमावला आहे पण विकास काय केला नाही, म्हणुन आजही हा परीसर मागासलेलाच आहे. येणाऱ्या काळात कोण बाजी मारेल आणि विकासाची गंगा वाहेल हे येणारं भविष्यकाळच सांगेल ,सध्यातरी वेगवेगळ्या पक्षाच्या उमेदवारांची चाचपणी चालु असुन एक योग्य, सक्षम ,उच्चशिक्षित, विकसनशील, उमेदवाराची आज गरज या जिल्हा परिषद गण मतदारसंघाला आहे अशी चर्चा सुशिक्षीत नवतरुन वर्गातुन होत आहे.

# शेतकऱ्यांनी कृषी समृद्धी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १४ नोव्हेंबर-**

वातावरणातील सततच्या बदलामुळे येणाऱ्या विविध आपत्तींना तोंड देऊन शेतकऱ्यांना सक्षम बनविणारी तसेच उत्पादनातील होणारी घट लक्षात घेऊन शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी कृषी समृद्धी योजना सन २०२५-२६ नाविन्यपूर्ण योजनेचा भोकर तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन दिलीप जाधव तालुका कृषि अधिकारी भोकर यांनी केले आहे.

कृषि समृद्धी योजनेमध्ये नाविन्यपूर्ण विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये किसान ड्रोन योजनेचे भोकर तालुक्यास १ लक्षांक असून किंमतीच्या ५०टक्के किंवा पाच लाख रुपये अनुदान, जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (बी आर सी) स्थापन करणेचे दोन लक्षांक असून किंमतीच्या ७५ टक्के किंवा एक लाख (शेतकरी गट) व पाच लाख(शेतकरी उत्पादक कंपनी )अनुदान, काढणी पश्चात शेतमाल थेट विक्रीसाठी फिरते वाहन विक्री केंद्र सुविधा योजनेचे किंमतीच्या ५०टक्के किंवा सात लाख रुपये अनुदान, जिल्ह्यातील शेतकरी प्रशिक्षण केंद्रांचे बळकटीकरण योजनेचे एक लक्षांक असून १००टक्के २०.०० लाख अनुदान, पीक प्रात्यक्षिका अंतर्गत चिया सीड्स प्रकल्प योजनेचे ४० हेक्टर लक्षांक असून ८५००/- रुपये प्रति हेक्टर १००% अनुदान, पीक प्रात्यक्षिका अंतर्गत मका प्रकल्प साठी १५०००/- प्रति हेक्टर अनुदान, कॉटन श्रेडर साठी ७५०००असून किंमतीच्या ५०% अनुदान, क्रॉप रिपर (सोयाबीन कापणी यंत्र) साठी ८५०००/किंमतीच्या ५०% अनुदान, स्पायरल सेपरेटर साठी ४५००/प्रति रुपये किंवा किंमतीच्या ५०% अनुदान या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करण्याचे आवाहन तालुका कृषि अधिकारी भोकर दिलीप जाधव यांनी केले आहे. ही योजना ऑफलाईन पद्धतीने अर्ज घेऊन उ्दढ तत्वावर राबविण्यात येणार आहे. लक्षांका पेक्षा जास्त अर्ज आल्यास लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येईल.तरी इच्छुक शेतकऱ्यांनी १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अर्ज भरून अर्जामधील नमूद आवश्यक कागदपत्रसह अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले.

# मुदखेड राष्ट्रवादीने निष्ठावंतांना डावलल्याने आगामी निवडणूकीत उमेदवारच मिळेना!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ नोव्हेंबर-**

आगामी मुदखेड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी आपापल्या परीने जय्यत तयारी सुरू केल्याचे चित्र शहरात दिसत आहे. मात्र, या तयारीच्या गडबडीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) अडचणी वाढताना दिसत आहेत.

शहरात नगरपरिषद निवडणुकीसाठी पक्षाला उमेदवारच मिळत नसल्याची जोरदार चर्चा सध्या मुदखेडमध्ये सुरू आहे. या अडचणींची प्रचीती दि ९ नोव्हेंबर २०२५ रोजी वैष्णवी मंगल कार्यालय येथे आयोजित केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) आढावा बैठकीत दिसून आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पक्ष निरीक्षक म्हणून ओमप्रकाश पोकर्णा व नागनाथराव घिसेवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला कार्यकर्त्यांसह अनेक इच्छुकांनी पाठ फिरवली असल्याचे चित्र पाहायला



मिळाले.

पक्षातील नाराजीचे मुख्य कारण म्हणजे, मागील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उत्तर जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली जाहीर करण्यात आलेली मुदखेड शहर व तालुका नवीन कार्यकारिणी. या कार्यकारिणीची निवड करताना निष्ठावंत, जुने, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले गेले नाही. जुन्या निष्ठावंतांना डावलून ही निवड करण्यात आल्यामुळे पक्षाचे माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या अंतर्गत कलहामुळे आणि निष्ठावंतांवरील अन्यायाच्या भावनेमुळे, जी आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शहरात मजबूत फळी (कार्यकर्त्यांची साखळी) निर्माण झाली होती, ती आजच्या घडीला विस्कळीत झाली आहे. परिणामी, आगामी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (अजित पवार गट) उमेदवार मिळणेही कठीण होईल अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा सध्या मुदखेडच्या नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे.

# सोशल मीडियावरच भाविंची चर्चा प्रत्यक्षात काम मात्र शून्य

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. १४ नोव्हेंबर-**

नगरपरिषद निवडणुकीत मात्र आपल्या नेत्यांची वाह वाह करण्यासाठी सोशल मीडियावर प्रसिद्धी करण्यासाठी धर्माबाद शहरातील युवा पदाधिकारी, कार्यकर्ते सरसावले आहेत. भावी नगराध्यक्षा व नगरसेवक यांचे समाजात आणि धर्माबाद शहरात काम मात्र शुन्य आहे. तरी सुद्धा युवा कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मीच भावी, फिक्स नगराध्यक्षा व नगरसेवक आहे. अशी भोळी भाबडी अशा दाखवून फेसबुक, व्हॉट्सअँप, इंस्टाग्राम यावर भावी आणि फिक्स नगराध्यक्षा,नगरसेवक आहे,अशा पोस्ट तयार करून कार्यकर्ते यांना टाकण्यास सांगत आहेत. जसे की,आजपर्यत किती सामाजिक बांधिलकी जपली आहे,शहरातील नागरिकांच्या सुखदुःखामध्ये धावून आल्यासारखे धर्माबाद शहराचा विकास पुरुष मी च आहे.असे सोशल मीडियावर पोस्ट त्यांचे कार्यकर्ते टाकत आहे. परंतु या भावी आणि फिक्स नगराध्यक्षा, नगरसेवक पोस्ट करतांना यांनी कधी प्रभागात काय काम केले याची माहिती कधी दिली आहे का? काय विकास करणार आहे हे सुद्धा माहिती नाही.ज्यांनी राजकारण तर सोडा साधे समाजकारण कधी केले नाही त्यांना ही मी फिक्स नगराध्यक्षा, नगरसेवक व्हावे असे दिवसा स्वप्न पडू लागले आहे.नगरपरिषदेचे निवडणुका जाहीर झाल्या पासून नगराध्यक्षा व नगरसेवक यांची इच्छुकांची भाऊगर्दी पहायला मिळत आहे. आपल्या जवळच्या चाहत्या कडून सोशल मीडियावर पोस्ट टाकून मीच कसा प्रभावी असे जनतेला दाखवण्यात येत असून नेत्यांच्या विश्वास पात्र दाखवण्यासाठी फोटो, व्हिडिओ, टाकून आपल्याला जनतेची पसंती असल्याचे दाखवत आहेत. परंतु यांचे प्रत्यक्षात प्रभागात व शहरामध्ये आजपर्यंत काय कार्य केले आहे, हेच यांना माहीत नाही. प्रचार करण्यासाठी फेसबुक, व्हॉट्सप, इंस्टाग्राम यासारख्या यंत्रणेचा वापर होत आहे.सर्व उमेदवार हे पक्षाच्या तिकिटासाठी आप आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्या कडे माझ्या नावाची शिफारस करा अशी मागणी करत असल्याच्या चर्चा समोर येत आहेत.परंतु ज्यांना उमेदवारीची शाश्वती आहे.आणि ज्यांचे राजकीय आणि सामाजिक काम आहे. ते रोज जनतेच्या संपर्कात राहून आपली सामाजिक बांधिलकी जपत आहेत.असे उमेदवार खुप कमी प्रमाणात दिसत आहेत.परंतु ज्यांचे कोणतेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक काम नाही त्यांना ही निवडणुकीचे डोहाळे लागले आहेत. आणि यांची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत आहे.

**जाहीर समन्स/नोटीस**

एम.एम. पी. अर्ज नं. ४३/२०५४

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ट स्तर सो. यांचे न्यायालयात**

श्री. प्रफुल्ल माणिक परदेशी — अर्जदार
विरुध्द
सौ. सविता प्रफुल्ल परदेशी — सामनेवाली

**प्रति,**
**सौ. सविता प्रफुल्ल परदेशी**
रा. द्वारा अरुण तोकलवाल
मु.पो. टेंभूणी, ता. नायगांव, जि. नांदेड
... सामनेवाली
.....यांना

**ज्याअर्थी,**

सदरचा अर्ज यातील अर्जदार याने सामनेवाली हिचे विरुध्द हिंदू विवाह कायदा कलम १२ (१) प्रमाणे दाखल केलेला आहे. तुम्ही सामनेवाली अर्जात नमूद पत्त्यावर राहत आहे. सदर पत्त्याबर तुम्हांला मे. कोर्टाचे मार्फत रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठविली होती व सदर रजिष्टर पोष्टाची नोटसौ तुम्ही घेतलेली आहे. तरीही तुम्ही मागील तारीख २९/१०/२०२५ रोजी में. फोर्टात हजर राहिला नाहीत. तरीहि मे. कोर्टानी जाहीर समन्स नोटीशीचा तुमचे विरुध्द आदेश दिला आहे. त्याप्रमाणे हे जाहीर समन्स / नोटीस मे. कोर्टाचे मार्फत देत आहे. त्याअर्थी,

तुम्ही सामनेवाली हिने सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ३/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता में, कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून में, कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फी आदेश होतील, मागाहून तक्रार चालणार नाही.


कळावे हे जाहीर समन्स/नोटीस में, कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली.

ता.१२।११। २०२५
क. लिपीक

**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर**
**बार्शी,ता. वार्शी, जि. सोलापूर**

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीमती मथुराबाई लाटे यांचे निधन



**परभणी,/प्रतिनिधी :** श्रीमती मथुराबाई कान्होबा लाटे वय ७५ यांचे आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे
वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्यावर आज दुपारी १.३० वाजता येलदरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. येथील ग्रामपंचायत सदस्य महेंद्र लाटे यांच्या त्या मातोश्री होत.

### आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे मित्र मंडळ पुरस्कर पूर्णा शहर विकास आघाडी नगराध्यक्षपदाचे उमेदवारी विमलबाई लक्ष्मणराव कदम यांना जाहीर



**पूर्णा/प्रतिनिधी :** आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे मित्र मंडळ पुरस्कर पूर्णा शहर विकास आघाडी नगराध्यक्षपदाचे उमेदवारी विमलबाई लक्ष्मणराव कदम यांना जाहीर
पूर्णा , प्रतिनिधी- पूर्णा नगरपालिका निवडणूक साठी पूर्णा शहराकडे आ.डॉ. रत्नाकर गुट्टे पुरस्कृत पूर्णा विकास आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून विमलबाई लक्ष्मणराव कदम यांची उमेदवारी आमदार डॉ .रत्नाकर गुट्टे यांनी जाहीर केली आहे.पूर्णा नगर परिषदेच्या निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने गुरुवारी राम मंदिरात गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ .रत्नाकर गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक व कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. त्यानंतर या मेळाव्यात आमदार डॉ .रत्नाकर गुट्टे यांनी पूर्णा शहर आघाडी च्या वतीने पूर्णा नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या उमेदवार म्हणून विमलबाई लक्ष्मणराव कदम यांची उमेदवारी जाहीर केली त्याचप्रमाणे वेगवेगळ्या वार्डातील नगरसेवक पदाचे उमेदवार ही यावेळी जाहीर करण्यात आले.या बैठकीला आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळाचे प्रभारी नितीन कदम,शहराध्यक्ष ॲड.राजेश भालेराव,मोकिद भोळे, गणेश कदम,सलीम सौदागर,अखिल अहमद, मगदूम कुरेशी, मधुकर गायकवाड, ढोणे आदी मान्यवर, कार्यकर्ते उपस्थित होते.

### पूर्णा नगरपालिकेच्या सहा अर्ज दाखल

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक साठी शुक्रवारी नगरसेवक पदासाठी केवळचार अर्ज दाखल झाले असून आज पर्यंत अध्यक्षपदासाठी एक तर नगरसेवक पदासाठी सहा अर्ज दाखल झाले आहेत पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सोमवारपासून पूर्णा तहसील कार्यालयात निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांच्या उपस्थितीत सुरू असून शुक्रवार पर्यंत केवळ या निवडणूक साठी सहा अर्ज दाखल झाले आहेत शुक्रवारी सदस्य पदासाठी चार उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत मात्र अध्यक्ष पदासाठी शुक्रवारी येथे उमेदवारी अर्ज दाखल झालेलं नाही आत्तापर्यंत केवळ अध्यक्ष पदासाठी एक तर सदस्य पदासाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत अद्याप पर्यंत राजकीय पक्षाचे उमेदवार ठरले नसल्यामुळे शुक्रवार पर्यंत एकही राजकीय पक्षाचा उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही त्यामुळे सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्यामुळे शनिवार व सोमवार रोजी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

### पंडित जवाहरलाल नेहरु यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**पूर्णा,/प्रतिनिधी-** देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.
यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रावण क्षीरसागर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिता भालेराव, तहसीलदार (सामान्य) रामदास कोलगणे, नायब तहसीलदार शीतल कच्छवे, प्रशांत वाकोडकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी इप्पर, नानासाहेब भेंडेकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हयात वाढली थंडी

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हयात थंडीचा जोर मोठया प्रमाणात वाढला असून या थंडीमुळे अनेकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच या असहाय्य अशा थंडीमुळे अनेकांनी आपल्या घरातील कामे करणे देखील दुरापास्त झाले आहेत. यावर्षी मोठया प्रमाणात पावसाळा झाला आहे. त्यामुळे अनेकांना थंडी पासून बचाव करण्यासाठी अनेक अडचणी जाणवत आहेत. त्यामुळे या थंडीचा जोर नागरिकांना असहाय्य होत आहे.

# बालदिनाचा आनंदोत्सव: जिल्हाधिकाऱ्यांसोबत मुलांची अविस्मरणीय सहल बालगृहातील मुलांचा खास बालदिन

## स्वतः जिल्हाधिकारी यांनी मुलांना घडविली बैलगाडीतुन सफर

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी-** बालदिनानिमित्ताने महिला व बालविकास विभागाच्यावतीने बालगृहातील मुलांसाठी आज धर्मपुरी येथील श्री राम बाग येथे एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीमुळे बालगृहातील मुलांना आनंद, उत्साह आणि अप्रतिम अनुभव लाभला. यावेळी स्वतः जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बैलगाडी हाकली व मुलांना फेरी मारून आणली. तसेच त्यांनी मुलांसोबत गाणी गायली, गप्पा मारल्या आणि प्रेमाने बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मुलांशी मैत्रीपूर्ण नातं जुळवून त्यांच्यात मिसळण्याची त्यांची शैली सर्वांना भावली.
उपस्थित अधिकारी-कर्मचारी वर्गांनेही मुलांना बालदिनाच्या शुभेच्छा देऊन



त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटवले. मुलांनी सहलीचा मनसोक्त आनंद घेतला, विविध खेळांचा, नैसर्गिक सौंदर्याचा व सहलीतील उपक्रमांचा आनंद लुटला. तसेच मुलांना या अनुभवावर निबंध लिहिण्याचे प्रोत्साहन देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीक्षमता आणि सृजनशीलतेला चालना मिळणार आहे.

एकूणच, परभणी जिल्ह्यातील या उपक्रमाने बालदिनाचा खरा अर्थ उजळला. बालपणाचा आनंद, मोकळेपणा आणि निरागसता पुन्हा अनुभवणे. सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये हा बालदिन हसतमुख, आनंददायी आणि संस्मरणीय वातावरणात साजरा झाला.
प्रारंभी जिल्हाधिकारी महोदयांच्या उपस्थितीत मुलांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मोनिका रंधवे, बालविकास प्रकल्प अधिकारी मिलिंद वाघमारे, ओबीसी महामंडळाचे संचालक रामेश्वर मुंढे, बालकल्याण समिती अध्यक्ष रवींद्र कातनेश्वरकर, बालकल्याण समितीचे सर्व सदस्य, जिल्हा परिविक्षा अधिकारी, महिला विकास व बालविकास विभागातील अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइनचे कर्मचारी, संरक्षण अधिकारी तसेच बालगृह अधीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजना लाभार्थ्यांना आधार प्रमाणिकरण करण्याचे आवाहन



**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी तालुक्यातील शहर व ग्रामीण भागातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य पुरस्कृत निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांनी अद्यापही आधार प्रमाणीकरण न केल्यामुळे १००२ लाभार्थी अनुदानापासुन वंचित राहिले आहेत. तरी सदर लाभार्थ्यांनी डी.बी.टी पोर्टलवर दि. ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे, असे आवाहन तहसिलदार डॉ. संदीप राजापुरे यांनी केले आहे.
तसेच आपले आधार कार्ड अपडेट व केवायसी करुन आधारकार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक व आधारलिंक असलेला मोबाईल नंबर सोबत घेऊन संजय गांधी निराधार योजना शहर व ग्रामीण विभाग तहसिल कार्यालय, परभणी येथे उपस्थित रहावे. यानंतर जर आधार प्रमाणीकरण राहिल्यामुळे लाभार्थी अनुदानापासुन वंचित राहिला तर यास सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची असेल याची नोंद घ्यावी, असे आवानही श्री. राजापुरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## ज्ञानसाधना प्रतिष्ठान नीट फाउंडेशनमध्ये बालदिनानिमित्त आनंदनगरीचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ वार शुक्रवार या दिवशी ज्ञानसाधना प्रतिष्ठान फाउंडेशन वर्ग ६ ते १०द्वारा आयोजित देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्म दिनानिमित्त अर्थात बाल दिनाचे औचित्य साधून भव्य अशा आनंदगरीचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. शितल सोनटक्के मॅडम यांची कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच आनंदनगरी कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन सौ. शितल सोनटक्के मॅडम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



याप्रसंगी सौ.शितल सोनटक्के मॅडम यांनी आपल्या मनोगतातुन विद्यार्थ्यांना थोरांच्या विचारातून,कार्यातून जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन कशा पद्धतीने निर्माण करावा, याबाबत मार्गदर्शन केले.तसेच फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे ज्ञान वाढवून स्वतःमध्ये संशोधक निर्माण करावा असे आवाहन केले.याप्रसंगी आनंद नगरी साठी विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल तयार केले होते. सर्व स्टॉलची पाहणी सौ.शितल सोनटक्के मॅडम यांनी काळजीपूर्वक करुन विविध खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी आणलेल्या समोसे ,कचोरी ,दहीवडा, मंचुरियन, ब्रेड सँडविच, पाणीपुरी, चने,मसाला पापड अशा विविध पदार्थांचा आस्वाद विद्यार्थ्यांनी घेतला. याप्रसंगी फाउंडेशन विभागाचे समन्वयक मा.आर.जी.पोले सर मुलींच्या वस्तीगृहाच्या समन्वयिका अश्विनी मॅडम विभाग प्रमुख सौ.महिपाल पी.व्ही., परीक्षा विभाग प्रमुख सौ.लोहट एस. ए. श्री.खंडेलवाल व्ही.बी. तसेच सर्व शिक्षक,शिक्षिका तसेच अधिक्षक शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पत्की एन.वाय यांनी तर आभार समन्वयक श्री.पोले आर.जी. यांनी मानले. कार्यक्रम आनंदात व उत्साहात संपन्न झाला.



## बस स्थानक निर्मितीसाठी जागा उपलब्ध करून द्या- भाजपा शहराध्यक्षांची मागणी

**शांतीलाल शर्मा**
**पालम ,/प्रतिनिधी:** पालम भाजपाचा कार्यकर्ता मेळाव्यास पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांची उपस्थिती होती या कार्यक्रमात पालकमंत्र्यांचा सत्कार करून पालम शहर भाजपा तर्फे शहराध्यक्ष पांडुरंग रोकडे यांनी पालम शहरात बस स्थानक निर्मितीसाठी पाटबंधारे विभागाची जागा परिवहन खात्यास वर्ग करून बस स्थानक निर्माण करून द्यावी अशी मागणी केली
पालम बस स्थानक निर्माण संघर्ष समिती ची स्थापना करुन पांडुरंग रोकडे यांनी गेली आठ वर्षे झाले बस स्थानक निर्मितीसाठी चळवळ निर्माण करून पाठपुरावा करत आहेत यावेळी पालकमंत्र्यांचा सत्कार करून निवेदन देताना पालम शहरातील पदाधिकारी उपस्थित होते उपशहर अध्यक्ष मुंजाभाऊ रोकडे बसवेश्वर लिंगायत सचिव आताऊल्ला खान पठाण युवा मोर्चा शहराध्यक्ष मंगेश जोंधळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

## संस्कृती वऱ्हाडची राज्यस्तरीय धावपटू म्हणून झळकणारी कांस्य कामगिरी !

**जिंतूर,/प्रतिनिधी-** क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने रत्नागिरी येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत कै. उत्तमराव जोगवाडकर माध्यमिक व उच्च माध्य मिक आश्रम शाळा, चारठाणा (ता. जिंतूर, जि. परभणी) येथील विद्यार्थिनी
संस्कृती गजानन वहाड हिने १७वर्षांखालील मुलींच्या गटात ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्य पदक मिळवून विद्याल याचा गौरव वाढविला आहे. संस्कृतीच्या या उल्लेखनीय यशा बद्दल विद्यालयात तसेच स्थानिक पातळीवर सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.
या विजयानंतर संस्थेचे अध्यक्ष शशिकांतराव देशपांडे,सचिव विजयराव कान्हेकर, इतर मागास बहुजन कल्याण विभाग परभणीचे सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, पोळे, नाटकर, दिलीप चव्हाण, संस्कृतीचे पालक गजानन व्हाड, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम पालवे तसेच विद्यालया तील सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व क्रीडा मार्गदर्शक गजानन सोर यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. चार ठाणा आश्रम शाळेने २००४ पासून क्रीडा क्षेत्रात भक्कम परंपरा निर्माण केली असून दरवर्षी तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर अनेक विद्यार्थी चमक दाखवत आहेत. कब्बडी, व्हॉली बॉल आणि मैदानी स्पर्धा मध्ये दरवर्षी पाच ते दहा विद्यार्थी राज्यस्तरीय पातळीवर पोहोचत आहेत.


सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३


## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा उमरी येथे बालिका पंचायत समितीची बैठक संपन्न

**परभणी ,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, उमरी येथे बालिकांच्या नेतृत्वगुणांना चालना देण्यासाठी आणि त्यांचे सामाजिक भान वाढवण्यासाठी बालिका पंचायत समितीच्या सभेचे आयोजन आज करण्यात आले होते.
या समितीचे गठण दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. गठणाच्या वेळी कुमारी मैथिली ननवरे यांची समितीच्या अध्यक्षपदी, तर कुमारी शिवानी सुरेश गोरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. याशिवाय जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा उमरी, कै. दामपुरीकर व विकास भारती शाळेतील एकूण दहा मुली या समितीत कार्यरत आहेत. आजच्या बैठकीला जिल्ह्याच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल विकास) रेखा काळम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी बालिका पंचायत समितीच्या सदस्य मुलींशी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक मुद्द्यांवर संवाद साधला. मुलींची वैयक्तिक स्वच्छता, पोषणयुक्त आहार, अभ्यासातील अडचणी, प्लास्टिकचा वापर कमी करणे, बालविवाहप्रतिबंध,व्यसनाधीनता निर्मूलन अशा विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. समस्यांवर उपाय शोधण्यासाठी त्यांनी मुलींना पुढे येण्याचे आवाहन केले. बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर यांनीही व्हिडिओ कॉलद्वारे बालिका पंचायत सदस्यांशी संवाद साधला. त्यांनी मुलींच्या अडचणी जाणून घेतल्या आणि आगामी कार्यासाठी त्यांना



प्रोत्साहन दिले. बालिका पंचायत ही मुलींना निर्णयक्षमतेकडे नेणारे प्रभावी व्यासपीठ असून त्याद्वारे सामाजिक बदल शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. या सभेसाठी एसबीसी-३/युनिसेफचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड, सेवा संस्था समन्वयक प्रियंका जोंधळे, एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या पर्यवेक्षिका जे. एस. जाधव, अंगणवाडी कार्यकर्त्या, तसेच शाळेतील शिक्षक शिवाजी गोजरटे, रघुनाथ कऱ्हाळे, सतीष जांभळे, श्री. चव्हाण, सौ. कऱ्हाळे, सौ. सोमावार, सौ. हाडे, तोरंबेकर, गव्हाणे, गोगुंडे, चौधरी यांचे विशेष सहकार्य लाभले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. रेड्डी यांनी संपूर्ण आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी सहाय्य केले. बालिका पंचायतच्या माध्यमातून मुलींमध्ये नेतृत्व, सामाजिक जाणीव, आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे सभेच्या शेवटी सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बिहारमधील विजयाचा भाजपकडून हिंगोलीत जल्लोष

## हिंगोलीत जंगलराज करणाऱ्यांनाही मतदार गाडतील- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

बिहार राज्यात भाजप आणि मित्रपक्षांनी विधानसभा निवडणुकीत मिळवलेला विजयाचा भारतीय जनता पक्षाकडून हिंगोलीत फटाक्यांची आतिषबाजी करीत मिठाई वाटप करून जल्लोष साजरा केला. यावेळी भाजप-चे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बोलतांना हिंगोलीत जंगलराज करण्याचा प्रयत्न करू पाहणाऱ्यांनाही आगामी नगर पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदार गाडतील असे वक्तव्य केले.

बिहार राज्यातील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी करण्यात आली. या मतमोजणीत भाजप आणि जेडीयू तसेच लोजपा या ती-नही पक्षांचा मोठा विजय झाला. दोन तृतीयांशपेक्षा जास्त विजय एनडीएला मिळाल्यामुळे तसेच भाजपला सर्वाधिक जागांवर विजय मिळाल्यामुळे हिंगो-लीत या विजयाचा उत्सव भारतीय जनता पक्षाकडून साजरा करण्यात आला. येथील गांधी चौकात आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आमदार रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शाम खंडेलवाल, उपाध्यक्ष संजय ढोके, युवा नेते शिवाजी मुटकुळे, पवन उपाध्याय, उमेश गुठ्ठे, वंदना लोखंडे, गुड्डु देवकते, माजी नगरसेवक सदाशिव सुर्यतळ, ॲड सुनील भूक्तर, प्रशांत सोनी, संदीप वाकडे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शरद जैस्वाल, बाबा घुगे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह तसेच बिहार-चे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वात बिहारमध्ये विकास करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वावर बिहारच्या जनतेने शिक्कामोर्तब करीत प्रचंड बहुमत दिले आहे. लालू प्रसाद यादव यांच्या जंगलराजची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी तेथील जनतेने जंगलराजला गाडले. हिंगो-लीतही काहीजण जंगलराज करण्याचा प्रयत्न करीत आ-हेत परंतु हिंगोलीचा मतदार नगर पालिका निवडणुकीत या जंगलराजला निश्चितपणे गाडून आम्ही हिंगोलीत केलेल्या विकास कामांना पसंदी देत भाजपला विजयी करणार आ-हेत. नगराध्यक्षही भाजपचाच होणार आहे असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांनीही आगामी नगर पालिका निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित होणार असून दि ३ डिसेंबरला शहरात फटाक्यांची आतिषबाजी करीत जंगलराजला संपवणार असल्याचा इशारा दिला.

# हिंगोलीत १८ नोव्हेंबरला सरदार १५० युनिटी पदयात्रा

## नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार आणि माय भारत हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार१५० युनिटी मार्च आणि विकसित भारत पदयात्रा उपक्रमाचे आयोजन मंगळवार, (दि.१८) रोजी सकाळी ८ वाजता हिंगोली येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, राष्ट्रीय सेवा योजना राज्य संचालक, जिल्हा युवा अधिकारी सारंग म श्याम, जिल्हा क्रीडा अधिकारी, राष्ट्रीय सेवा योज-नेचे जिल्हा समन्वयक डॉ. पवन बन्सोड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या पदयात्रेद्वारे तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण राष्ट्राच्या ऐक्य, अखंडता आणि देशभक्तीच्या भावनांना पुनरुज्जीवित करतील. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या एकसंध भारताच्या विचारांना स्मरून एकात्म भारताच्या निर्मितीचा संकल्प या माध्यमातून घेतला जाणार आहे. तरुणांमध्ये राष्ट्रीय अभिमान, सामाजिक जबाबदारी आणि एकतेची भावना निर्माण करणे असा या उपक्रमाचा उद्देश असून, सर्व नागरिकांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन माय भारत केंद्राचे अधिकारी अनिल ढेंगे यांनी केले आहे.

६ ऑक्टोबर २०२५ रोजी भारत सरकारने माय भारत पोर्टल वरून सरदार१५० युनिटी मार्च या डिजिटल मोहिमेची सुरुवात केली. या उपक्रमात सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सरदार१५० यंग लीडर्स कार्यक्रमाचा समावेश आहे. या कार्यक्रमातील १५० विजेत्यांना राष्ट्रीय पदयात्रेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

मोहिमेचे दोन टप्पे असून, प्रत्येक जिल्ह्यात ८ ते १० कि.मी. लांबीची पदयात्रा काढली जाईल. शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वादविवाद, परिसंवाद, पथनाट्य आदी उपक्रम,ड्रग्जमुक्त भारत व अभिमानाने स्वदेशी अशा प्रतिज्ञा अभियानासह योग, आरोग्य व स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रमाणपत्र वितरण केले जाईल. पदयात्रेचे नेतृत्व एनसीसी अधिकारी करतील.

करमसद (पटेल यांचे जन्मस्थान) ते केवडिया (स्टॅच्यू ऑफ युनिटी) असा १५२ कि.मी. प्रवास होईल. मार्गावरील गावांमध्ये सामाजिक विकास उपक्रम, डेव्हलपिंग इंडिया प्रदर्शन आणि सरदार गाथा सादर केली जाईल. सर्व नोंदणी माझे भारत पोर्टल यावर सुरू आहे. तरुणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला प्रत्यक्षात आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कुष्ठरोग मोहीम यशस्वीपणे राबवा- पालकमंत्री झिरवाळ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांचे लवकरात लवकर निदान करून त्यांना त्वरीत औषधोपचार सुरु करून पूर्ण मात्रा देणे हे कुष्ठरोग निर्मूलनासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी पालक मंत्री नर-हरी झिरवळ यांच्या नेतृत्वाखाली कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार असून, ती यशस्वीपणे राबविण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

समाजातील सर्व कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन निदाननिश्चिती नंतर तात्काळ औषधोपचार सुरु करणे अत्यंत महत्वाचे आहे. कुष्ठरुग्ण निदान व औषधोपचारापासून वंचित राहिल्यास अथवा विलंब झाल्यास रुग्णाला या रोगांपासून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीचा सामना तर करावा लागते-च आणि त्याच्या सहवासातील इतर निरोगी लोकांना रोगाची लागण होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे सर्व कुष्ठरुग्ण शोधण्यासाठी सोमवार, दि.१७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर, २०२५ या कालावधीमध्ये विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये कुष्ठरुग्णांचे संशयित शोधून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून निदान निश्चितीनंतर तात्काळ उपचार सुरु करण्यात येणार आहेत. या कालावधीत राज्यातील सुमारे ८ कोटी ६६ लाख लोकसंख्येची घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यांमध्ये ११३५ चमूमार्फत ११ लाख २३ हजार ८३६ लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांमध्ये आरोग्य कर्मचारी, आशा व पुरुष स्वयंसेवक हे घरोघरी जावून संशयित कुष्ठरुग्ण शोधण-ार आहेत. संशयित कुष्ठरुग्णांना निदान निश्चितीसाठी आरोग्य संस्थेमध्ये पाठविणार आहेत. कुष्ठरोगाचे निदान झालेल्या कुष्ठरुग्णांवर तातडीने मोफत औषधोपचार सुरु करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले आहे.



**हिंगोली- क्रिडा व युवक संचालनालय पुणे, जिल्हा क्रिडा परिषद व जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील कै शिवाजीराव देशमुख सभागृहात युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या युवक महोत्सवाचे उद्घाटन करतांना ज्येष्ठ पत्रकार विजय निलावार, आदर्श शिक्षक एम एम राऊत, साहीत्यीक तथा कवयित्री सिंधूताई दहीफळे आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कोंढूर जि प शाळेला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

हिंगोली- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी गुरूवार दि १३ नोव्हेंबर रोजी कळमनुरी तालुक्यातील कोंढूर येथील जिल्हा परिषद शाळे-ला भेट देऊन शाळेतील शैक्षणिक व भौतिक सुविधांचा आढावा घेतला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश पतंगे आणि शिक्षक राजू सावंत, निखीलकुमार नवले उपस्थित होते.जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शाळेचा परिसर, वर्गखोल्या, शैक्षणिक साधनसामग्री, राबविण्यात येणारे उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पाहणी केली. त्यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली आणि गणित व इंग्रजी विषयावर विशेष भर देण्याचे शिक्षकांना सुचविले.६ वी व ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचा आत्मविश्वास वाढविला आणि नियमित अध्ययनाचे महत्त्व पटवून दिले. एकूणच शाळेचे वातावरण, शिक्षकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून जिल्हाधिकारी गुप्ता यांनी समाधान व्यक्त केले.

### जिल्ह्यातील साखर कारखान्याचा ऊसतोडणी व वाहतुक खर्च निश्चित

हिंगोली- सद्यस्थितीत कारखान्यामार्फत ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा उभारणी करुन शेतकऱ्यांच्या वतीने ऊस तोडणी व वाहतूक केली जाते. यासाठी आलेला खर्च हा ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या ढोबळ रास्त व किफायतशीर दराच्या (एफआरपी) देय रकमेतून कपात करण्यात येतो. त्यानुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गाळप हंगाम २०२४-२०२५ या वर्षाच्या ऊसतोडणी व वाहतूक खर्चाची माहिती व्हावी, यासाठी कारखानानिहाय ऊसतोडणी व वाहतूक खर्चाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि. डोंगरकडा ता. कळमनुरी युनिट-२ जि. हिंगोली या कारखान्याचा प्रती मेट्रिक टन सरासरी ऊस तोडणी व वाहतूक दर ८६६.६९ रुपये आहे. पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगर जि. हिंगोली या कारखान्याचा प्रती मेट्रिक टन सरासरी ऊस तोडणी व वाहतूक दर ८८५.८८ रुपये आहे. कपीश्वर शुगर अँन्ड केमिकल लि., जवळाबाजार ता. औंढा नागनाथ या कारखान्याचा प्रती मेट्रिक टन सरासरी ऊस तोडणी व वाहतूक दर ८४६.२५ रुपये आहे. टोकाई सहकारी साखर कारखाना लि. कुरूंदा ता. वसमतनगर या कारखान्याचा प्रती मेट्रिक टन सरासरी ऊस तोडणी व वाहतूक दर ८९०.३६ रुपये आहे. शिऊर साखर कारखाना प्रा. लि. वाकोडी, ता कळमनुरी या कारखान्याचा प्रती मेट्रिक टन सरासरी ऊस तोडणी व वाहतूक दर ९१०.७२ रुपये आहे. सरासरी ऊसतोडणी व वाहतूक खर्च जर शेतकऱ्यांना जास्त वाटत असेल तर संबंधित कारखान्याच्या कार्यक्रमानुसार शेतकऱ्यास स्वत: ऊसतोडणी करुन तो गाळपासाठी नेता येईल. याकडेही ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे, असे आवाहन प्रादेशिक सहसंचालक (साखर) विश्वास देशमुख यांनी केले आहे.

### ५१ वाहन चालकांवर कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५१ वाहन चालकांवर पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ४०५०० चा दंड वसुल केला.

# निवडणुक विभागाच्यावतीने मतदान जनजागृती रॅली




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी अरविंद मुंडे यांच्या हस्ते शुक्रवारी मतदान जनजागृती रथाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी हिंगोली शहरातील सर्वच नागरिकांना होत असलेल्या नगरपालिका निवडणुकीत जास्तीत जास्त संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावे असे आवाहन केले. प्रसार माध्यम कक्षाचे प्रमुख पंडित मस्के, श्याम माळवटकर, उप मुख्याधिकारी प्रकाश साबळे, चाटे, संदीप घुगे, शिवाजी घुगे कैलास तिथे यांच्यासह इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. आहे.

# पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची बदली? राजकीय दबाव असल्याची जोरदार चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

अवैध धंदे चालकांविरूध्द पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जोरदार मोहीम उघडली आहे. त्यामुळे अवैध धंदेचालकांचे चांगलेच धाबे दणाणले होते. परंतु अचानक त्यांची बदली झाल्याची जोरदार चर्चा सुरू झाल्याने नगर पालिका निवडणुकीच्या तोंडावर चर्चेला उधाण आले आहे. बदलीमुळे गृहविभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी वाळू माफीया, अट्टल गुन्हेगारांना तडीपारीची कारवाई तसेच मटका, जुगार, अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. राजकीय दबावाला न जुमानता पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अवैध धंदे चालकांवर कारवाईचा धडाका लावला होता. त्यांच्या कार्यपध्दतीमुळे राजकीय वरद-हस्त असलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये खळबळ माजली होती. पोलिस अधीक्षक कोकाटे यांची बदली झाल्याची माहीती मिळत असली तरी त्यांची बदली अचानक ऐन नगर पालिका निवडणुकीच्या काळात का करण्यात आली असा सवाल सर्वसामान्य नागरिक करीत आहे.

मागील दीड वर्षापूर्वी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पोलिस अधीक्षकपदाचा पदभार स्विकारला होता. जिल्ह्यात गुन्हेगारांवर चांगलाच वचक बसविला आहे. त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाले तर अवैध व्यवसाय करणाऱ्यांना तंबी देऊन त्यांच्यावर हद्दपारीची कारवाई देखील केली आहे. याशिवाज जिल्ह्यात दोन किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेंगारांची माहीती सादर करण्याच्या सुचना ठाणेदारांना दिल्या होत्या. यामध्ये गंभीर गुन्हे असलेल्या तब्बल ५५ पेक्षा अधिक गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली असून पाच पेक्षा अधिक गुन्हे असलेल्यांना स्थानबध्द करण्यात आले आहे. त्यामुळे अवैध व्यवसाय व गुन्हेगारांवर वचक निर्माण झाला आहे. याशिवाय महसूल पथकाच्या बरोबरीने पोलिस विभागाने वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ४० पेक्षा अधिक जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

जिल्ह्यात पोलिस विभागाची कामगिरी चांगली असतांनाही आता पालिका निवडणुकीच्या तोंडावर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची बदली झाल्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. या बदलीमागे राजकीय सत्ताधाऱ्यांचा दबाव असल्याचे बोलले जात आहे. परंतु सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. मागील काही दिवसांपूर्वी पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी अवैध धंदेचालकांना बोलावून त्यांची परेड घेतली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते असूनही चांगल्या अधिकाऱ्याची बदली होते अशी चर्चाही शहरात होत आहे.

# पवार पब्लीक स्कुलमध्ये बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांची दंत तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

येथील पवार पब्लिक इंग्रजी शाळेत शुक्रवारी पंडित जवाहर नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांची डॉ. हेडगेवार दंत रुग्णालयाच्या वतीने तपासणी करण्यात आली.

येथील पवार पब्लिक स्कुल मध्ये बाल दिवसा चे आवचित्य साधून भारताचे पाहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष शिवाजी पवार यांच्या करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मंदा पवार, संचालक प्रणव पवार सॉली जॉबीन, दीपाली राऊत, अपर्णा जामकर, कोमल अग्रवाल, मुदिराजताई, ठाकरे, धनवे, फिजा, सचिन धामणे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, योगेश थोरात, गजानन वानरे, जॉबीन, पाईकराव, वैभव काळे, आदींची उपस्थिती होती. यावेळी जयंती कार्यक्रमानंतर बाल दिवसा-चे आवचित्य साधून पवार पब्लिक स्कुल मध्ये डॉ. हेडगेवार दंत महाविद्यालयाच्या पथकाने डॉ. कुणाल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली युकेजी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले. काही दहा ते विस विद्यार्थ्यांचे दात किडल्याचे आढळून आल्याने त्यांना रुग्णालयात पुढील आपचारासाठी बोलवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी दिवसातून दोन वेळा ब्रश करणे आवश्यक आहे. दातांची काळजी घेण्याच्या सूचना दंत महाविद्यालयातील इंटरशिप करण्याऱ्या डॉक्टरांनी दिल्या.

# शहरातील विविध मतदान केंद्राची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ नोव्हेंबर**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी आणि वसमत नगर परिषदेची निवडणूक जाहीर केली आहे. या निवडणुकीसाठी दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शहरातील विविध भागातील मतदान केंद्राची पाहणी करीत आवश्यक सूचना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या.

हिंगोली नगर पालिकेच्या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात येत असून या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी हिंगोली शहरातील अण्णाभाऊ साठे वाचनालय, इकबाल उर्दू स्कूल पेन्शनपुरा, गोपीनाथ मुंडे शेतकरी भवन, भारती विद्यामंदीर, नगर परिषद शाळा, आजम कॉलनी येथील इकबाल इंटरनॅशनल स्कूल, माहेश्वरी भवन येथील मतदान केंद्राना भेटी देऊन मतदानाच्या दिवशी केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांची पाहणी केली. तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.